www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक **युवक आधार** मराठी
तरुणांचा बुलंद आवाज




मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ | अंक : 289 | शुक्रवार दि. 04 जुलै २०२५ | किंमत : 2 रु | पृष्ठ : ४

# थोरा-मोठ्यांच्या जीवनातून विद्यार्थ्यांनी प्रेरणा घ्यावी -लोकनेते रामशेठ ठाकूर

दैनिक युवक आधार

पनवेल (प्रतिनिधी) जिद्द आणि चिकटीच्या जोरावर आम्ही सर्वजण आयुष्यामध्ये यशस्वी होऊ शकलो. तुम्हीही थोरा-मोठ्यांच्या जीवनप्रवासातून प्रेरणा घेऊन यशस्वी व्हा, असे आवाहन रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे ज्येष्ठ सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना केले. श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि भारतीय जनता पक्ष उलवे नोड-२ यांच्या वतीने 'रयत'च्या गव्हाण येथील येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये



मोफत वह्या वाटपाचा कार्यक्रम बुधवारी आयोजित करण्यात आला होता. त्या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर बोलत होते. त्यांनी मंचावर उपस्थित असणाऱ्या विद्यालयाच्या सर्व माजी विद्यार्थ्यांनी केलेल्या प्रगतीपासून विद्यार्थ्यांनी स्फूर्ती घ्यावी, असे आवर्जून सांगितले. या समारंभास रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य जे.एम. म्हात्रे, वाय.टी. देशमुख, कामगार नेते महेंद्र घरत, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे उपाध्यक्ष, गव्हाण विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन तथा 'रयत'चे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत, यांची प्रमुख उपस्थिती होती. विद्यालयाच्या भौतिक सुविधांसाठी सदैव मदतीचा हात देणारे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विद्यालयाच्या सर्व विद्यार्थ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरून गुणवत्ताधारक व्हावे यासाठी याआधी गतवर्षी विद्यालयास १५ लाख रुपयांच्या देणगीतून १५ इंटरअॅक्टिव्ह पॅनेल दिले आहेत. उर्वरित वर्गखोल्यांसाठीदेखील नऊ लाख रुपयांचे नवीन नऊ इंटरअॅक्टिव्ह पॅनल बसवून देण्याचे या वेळी बोलताना त्यांनी जाहीर केले. विद्यालयाच्या नवनिर्वाचित प्राचार्य तसेच 'रयत'च्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्य ज्योत्स्ना ठाकूर यांनी प्रास्ताविकात गव्हाण विद्यालयाच्या वाटचालीबद्दल माहिती देत लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विद्यालयासाठी केलेल्या विकासात्मक कामांची सविस्तर माहिती दिली आणि त्यांना धन्यवाद दिले. **पान २ वर**

## फळपीक विमा योजनेस अर्ज करण्यासाठी चार दिवसांची मुदतवाढ

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**



**नांदेड** - हवामान आधारित फळपीक विमा योजनेच्या मर्यादित कालावधीत केंद्र सरकारने मुदतवाढ देऊन राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा दिल्याचे कृषिमंत्री अॅड. माणिकराव कोकाटे यांनी सांगितले. केंद्र आणि राज्य शासनाच्या योग्य समन्वयामुळे पिक विमा काढण्यासाठी शेतकऱ्यांना आता ६ जुलै २०२५ पर्यंत अर्ज करता येणार असल्याचे कृषिमंत्री अॅड. कोकाटे यांनी सांगितले हवामान आधारित फळपीक विमा योजनेंतर्गत मृग बहार २०२५ मध्ये द्राक्ष, पेरू, लिंबू, संत्रा, चिकू, मोसंबी या पिकांसाठी विमा योजनेत भाग घेण्यासाठी अंतिम दिनांक ३० जून २०२५ होती, मात्र २७ जून २०२५ पासून संकेतस्थळाबाबत समस्या असल्याने विमा अर्ज करण्यामध्ये तांत्रिक अडचणी येत असल्याच्या तक्रारी शेतकरी बांधवांकडून येत होत्या. याबाबत केंद्र सरकारशी योग्यवेळी समन्वय साधल्याने एकूणच परिस्थितीचा विचार करून दिनांक ३ ते ६ जुलै २०२५ असे एकूण चार दिवस वरील पिकांकरिता मुदतवाढ दिली आहे. त्यानुसार शेतकऱ्यांनी केंद्र सरकारच्या WWW.PMFBY.GOV.IN या संकेतस्थळाला भेट देऊन विमा योजनेचा अर्ज करावा, असे आवाहन कृषिमंत्री अॅड. कोकाटे यांनी केले आहे

## जेष्ठ नागरिकांची फसवणूक करणाऱ्या आरोपी विरोधात कामोठे पोलिसांची जनजागृती

**दैनिक युवक आधार**

**पनवेल ( वार्ताहर )** : जेष्ठ नागरिकांची फसवणूक करणाऱ्या आरोपी विरोधात कामोठे पोलिसांनी ठिकठिकाणी सदर आरोपींचे फोटो लावून जनजागृती अभियान राबविले आहे . लक्ष्मण रोहिदास पवार मु. इरळद, ता. गंगाखेड, परभणी सदरचे इसम हे हद्दीमध्ये मोफत धान्य वाटप तसेच वाढदिवसानिमित्त पैसे वाटप अशा प्रकारची बतावणी करून वृद्ध महिला तसेच इतरांची सोने तसेच पैसा मोबाईल त्यांची लूट करत आहेत. सदरच्या व्यक्ती पासून आपण सावध रहा. या व्यक्ती आढळल्या तर तात्काळ ११२ किंवा कामोठे पोलीस स्टेशन ८६५५३५४११४ या नंबर वर संपर्क साधावा.

## महाराष्ट्र बांधकाम उद्योग सेनेच्या वतीने मुंबई येथे मंत्रालयासमोर आंदोलन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल ( वार्ताहर )**

: महाराष्ट्र बांधकाम उद्योग सेनेच्या वतीने मुंबई येथे मंत्रालयासमोर आंदोलन छेडण्यात आले . अधिकृत सीसी व रेरा नोंदणी न करता डाऊन पेमेंट (डी पी ) च्या नावाखाली जनतेकडून करोडो रुपये उचलून सामान्य नागरिकांची फसवणूक करणाऱ्या नवी मुंबई येथील सर्व बिल्डर्सवर कडक कायदेशीर कारवाई करावी व सदर बिल्डर्सना सिडकोने दिलेले प्लाट तत्काळ रद्द करावे या मागणीसाठी आज मुंबई येथे मंत्रालयासमोर आंदोलन करण्यात आले त्यानंतर सरकारच्या






नगरविकास विभागाच्या वतीने नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांचे सरकारी सचिव सुबराव शिंदे यांनी मंत्रालयात चर्चेसाठी निमंत्रण दिले. चर्चेमध्ये सदर बिल्डर्सवर कडक कारवाई करावी अशी मागणी महाराष्ट्र बांधकाम उद्योग सेनेचे अध्यक्ष प्रशांत अनगुडे यांनी केली, त्यावर सचिव मोहोदयांनी सदर प्रकरणाची चौकशी करून तत्काळ कारवाई करण्याचे आदेश सिडकोला दिले आहेत. संघटनेच्या वतीने सदर विषयी लवकरच उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करून वरील विषयावर कायमचा तोडगा काढला जाईल असे प्रशांत अनगुडे यांनी सांगितले.

## रिटघर शाळेच्या स्वच्छालय व इंटरअॅक्टिव्ह पॅनल चे उद्घाटन रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

ग्रुप ग्रामपंचायत दूंदरे च्या वतीने थेट सरपंच सुभाष शेठ भोपी यांच्या नेतृत्वाखाली भैरवदेव विद्यालय व रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय ला अत्याधुनिक सुसज्ज स्वच्छालय बांधून देण्यात आले तसेच मा.श्री. रामशेठ ठाकूर यांनी लाख रुपये किमतीचे १० वर्गांना इंटरअक्टिव्ह पॅनल देण्यात आले त्याचे आज त्याचे उद्घाटन आज २ जुलै रोजी माजी खासदार रामशेठ ठाकूर



यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी उपस्थित माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा सत्कार ग्रुप ग्रामपंचायत दूंदरे च्या वतीने व सरपंच सुभाष भोपी व कमिटी कडून करण्यात आला तसेच यावेळी सरपंच सुभाष भोपी रयत शिक्षण संस्थेचे विभागीय अधिकारी केंगेरे सर उपसरपंच शितल भोपी, रमेशशेठ पाटील आदींचा सत्कार करण्यात आला यावेळी विद्यार्थ्यांना गणवेश व रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाकडून वह्या वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले यावेळी उपस्थित मान्यवर ग्रुप ग्रामपंचायत थेट सरपंच सुभाष शेठ भोपी, माजी सरपंच भारत भोपी, विलास भोपी, राजेश भोपी, गोपीनाथ शेठ भोपी ,दीपक पाटील,कीसन पाटील,बलीराम भोपी,विष्णु भगत,वंदना भोपी, ग्रामपंचायत सदस्य विश्वास पाटील ,शांताराम चौधरी,जयदास चौधरी ,प्रलय भोपी,कमला वाघमारे,ललीता चौधरी,राणी सिनारे,ग्रामसेवक खेडकर साहेब प्राचार्य कारंडे सर आदी मान्यवर उपस्थित होते

## मोटरसायकल डीव्हायडरवर आदळल्याने ऋषिकेश गावडेचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल**

मोटरसायकल डिव्हायडरवर आदळून ऋषिकेश मनोज गावडे (वय 30) याचा मृत्यू झाला तर त्याचा मित्र कल्पेश कोल्हटकर (राहणार करंजाडे) हा जखमी झाला. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली.

29 जून रोजी ऋषिकेश गावडे याने कल्पेश याला त्याच्या. करंजाडे येथील रूमवर जेवण करण्यासाठी बोलवले. त्यानंतर रात्री दोनच्या सुमारास ते दोघे ऋषिकेशची यामाहा मोटरसायकल क्रमांक एम एच 46 सिटी 7767 यावर गोवा हायवे वर जाण्याचे ठरवले. ते पळस्पे येथे गेले आणि परत पळस्पे ते करंजाडे असे येत असताना अचानक पाऊस आला. यावेळी जेएनपीटी हायवेवर मॅरेथॉन बिल्डिंग जवळ कटवर असलेल्या डिव्हायडरवर मोटरसायकल जाऊन आदळली आणि ऋषिकेश आणि अल्पेश दोघेही रस्त्यावर पडले. त्यांना एमजीएम हॉस्पिटल कामोठे येथे दाखल करण्यात आले. या अपघातात ऋषिकेश गावडे याचा मृत्यू झाला तर अल्पेश कोल्हटकर जखमी झाला.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या १० लाख रुपयांच्या देणगीतून इंटरअॅक्टिव्ह पॅनलचे उद्घाटन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

पनवेल तालुक्यातील रिटघर येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री भैरवदेव विद्यालय आणि लोकनेते रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते त्यांनी दिलेल्या १० लाख रुपयांच्या देणगीतून इंटरअॅक्टिव्ह पॅनलचे उद्घाटन करण्यात आले. यासोबतच त्यांच्या हस्ते ग्रुप ग्रामपंचायत दुंदरे यांच्यामार्फत बांधण्यात आलेल्या स्वच्छतागृहाचे व मोफत शालेय गणवेश वाटप तसेच रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांच्या सौजन्याने वह्या वाटपाचा कार्यक्रम बुधवारी संपन्न झाला. या वेळी विद्यालयातील पाचवीच्या विद्यार्थ्यांना शालेय गणवेश




व वह्या सर्व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी ज्युनिअर कॉलेजच्या इंटरअॅक्टिव्ह पॅनलसाठी आणखी १० लाख रुपये देणगी जाहीर केली तर राहुल ड्रेसेस पनवेल यांच्याकडून १५ गणवेश मोफत देण्यात आले, तसेच विद्यालयातील सर्व शिक्षकांनी वर्गणी काढून इयत्ता पाचवीच्या सर्व विद्यार्थ्यांना शालेय गणवेश वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला सरपंच सुभाष भोपी, बाळाराम भोपी, बळीराम भोपी, राजेश भोपी, वंदना भोपी, विलास भोपी, उपसरपंच शितल भोपी, माजी सरपंच रमेशशेठ पाटील, एम. के.कोंगेरे, व्ही.यू.जगताप, प्रल्हाद भोपी, वासुदेव भोपी, भारत भोपी, गोपीनाथ भोपी, पोलीस पाटील दिपक पाटील, कृष्णा पाटील, विष्णू भगत, प्रल्हाद भोपी, विश्वनाथ भोपी, नवनाथ भोपी, संतोष पाटील, विद्यालयाचे मुख्याध्यापक आर.बी.कारंडे, ए. ए.पाटील आदी उपस्थित होते

## राज्यातील बांधकाम पूर्ण झालेले प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रे कार्यान्वित करा- आमदार प्रशांत ठाकूर यांची विधिमंडळ अधिवेशनात मागणी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

राज्यातील बांधकाम पूर्ण झालेले प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रे कार्यान्वित करण्याची मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी तारांकित प्रश्नाच्या माध्यमातून शासनाकडे केली. त्या अनुषंगाने लवकरच सर्व आरोग्य केंद्रे कार्यान्वित करण्याचे आश्वासन राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी लेखी स्वरूपात दिले. राज्यात सन २०२१ ते सन २०२५ या कालावधीत ४१६ प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि उपकेंद्राचे बांधकाम पूर्ण करण्यात आले असून सद्यःस्थितीत त्यातील २१३ केंद्र अद्याप सुरू झाली नसल्याचे मे २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे. सदर आरोग्य केंद्रांना आवश्यक असलेले फर्निचर, वीज जोडणी यांसारख्या मूलभूत सुविधा उपलब्ध नसणे, काही ठिकाणी उद्घाटन कोण करणार असे प्रश्न निर्माण होणे तसेच आरोग्य कर्मचारी नेमण्यासाठी निधी देण्यात येत नसणे इ. कारणास्तव सदर आरोग्य केंद्र अद्याप सुरू करण्यात आली नसल्याने रुग्णांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे या प्रकरणी शासनाने चौकशी करुन त्याअनुषंगाने सदर प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांना मूलभूत सुविधांसाठी तत्काळ निधी वितरित करुन सदर विनावापर असलेली आरोग्य केंद्रे तातडीने कार्यान्वित करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असा तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर यांनी मुंबई येथे सुरु असलेल्या विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात दाखल केला होता. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची असलेली ही केंद्रे तातडीने सुरु करून गावागावात दर्जेदार आरोग्य सेवा पोहोचवावी, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी या प्रश्नाच्या माध्यमातून नमूद केले. या प्रश्नावर आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिलेल्या लेखी उत्तरात सांगितले कि, सन २०२१ ते सन २०२५ या कालावधीत ४१६ प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि उपकेंद्राचे बांधकाम पूर्ण करण्यात आले असून सद्यःस्थितीत काही केंद्र अद्याप सुरु झाली नसल्याची बाब अंशतः खरी आहे. सद्यःस्थितीत बांधकाम पूर्ण करण्यात आलेल्या २१३ उपकेंद्रांपैकी २०६ आरोग्य केंद्र कार्यान्वित झालेली असून उर्वरित आरोग्य उपकेंद्र सुरु करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे. २०६ आरोग्य उपकेंद्रात आरोग्य सेवा सुरु करण्यात आली असुन उर्वरित ०७ आरोग्य उपकेंद्रातील फर्निचर व वीज जोडणीचे काम अंतिम टप्प्यात असुन लवकरच सदरहू आरोग्य उपकेंद्र कार्यान्वित करण्यात येतील. तसेच सदरील आरोग्य उपकेंद्रांत आरोग्य विषयक मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याकरिता पुरवणी मागणीचा प्रस्ताव विधानमंडळाच्या आगामी अधिवेशनामध्ये सादर करण्यात आलेला आहे.



## साधना येरेकार यांना सेवानिवृत्ती निमित्त निरोप समारंभ

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-**
**जितेंद्र खोडे**

राळेगाव:- न्यु इंग्लिश हायस्कूल पगारदार कर्मचारी सहकारी संस्थेकडून न्यू इंग्लिश हायस्कूल येथील कार्यरत शिक्षिका सौ.साधना येरेकार यांना दिनांक ३० जून रोजी त्यांच्या सेवानिवृत्ती निमित्त भावस्पर्शी निरोप देण्यात आला यावेळी सौ.साधना येरेकार यांनी दि. ३० जुन रोजी शासनाचे नियमानुसार वयाची ५८ वर्ष पूर्ण झाल्यामुळे शासकीय सेवेतून त्या निवृत्त झाल्या. त्यांच्या सेवानिवृत्ती निमित्त भावस्पर्शी या निरोप समारंभ कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शालेय पतसंस्थेच्या अध्यक्षा कु.रेखा कुमरे या होत्या,तर प्रमुख पाहुणे म्हणून न्यू इंग्लिश हायस्कूल चे मुख्याध्यापक विजय कचरे, उपमुख्याध्यापक सुरेश कोवे शिफ्ट इन्चार्ज अरुण कामनापुरे,पतसंस्था उपाध्यक्ष विनोद चिरडे हे प्रमुख पाहुणे म्हणून यावेळी उपस्थित




होते. यावेळी सौ साधना येरेकार यांना सेवानिवृत्ती निमित्त न्यु इंग्लिश हायस्कूल पगारदार कर्मचारी सहकारी संस्था यांच्याकडून शाल,श्रीफळ व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. तसेच यावेळी सौ साधना येरेकार यांच्या निरोप समारंभ कार्यक्रमाचे निमित्ताने शाळेतील अनेक शिक्षकांनी,प्रमुख पाहुण्यांनी तसेच सत्कारमूर्ती यांनी यावेळी आपले विचार व्यक्त केले.निरोप समारंभाच्या या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पतसंस्था सचिव किशोर उईके यांनी तर आभार प्रदर्शन विनोद चिरडे यांनी केले.या कार्यक्रमास शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका, प्राध्यापक उपस्थित होते.

# उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोती अभियान अंतर्गत एचडीएफसी बँकेकडून आयसीआरपी सत्कार सोहळा संपन्न

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:- जितेंद्र खोडे**

राळेगावः– दिनांक ०२/०७/२०२५ रोजी सीएलबीसी ऑफिस राळेगाव येथे हा कार्यक्रम आयोजित केला होता. त्या कार्यक्रमाचे आयोजन एचडीएफसी बँक राळेगाव यांच्या तर्फे करण्यात आले, कार्यक्रमाचे अध्यक्ष व उपाध्यक्ष, प्रमुख अतिथी यांचे मान्यवरांनी स्थान ग्रहण केले आणि नंतर क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले,दिप प्रज्वलन करून नंतर प्रास्ताविक मनोगत व्यक्त केले तसेच मान्यवरांनी होतकरू महिलाशी संवाद साधण्यात










आला, त्या महिलाचा सत्कार आणि पुरस्कार वितरण सोहळा पार पडला , मान्यवरांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले,केंद्र शासनाने दिन दयाळ अंतोदय योजना राष्ट्रीय ग्रामीण जीवन्नोती अभियान ची स्थापना केली,त्या अंतर्गत गाव पातळीवर काम करनाऱ्या महिला आयसीआरपी समुहच्या मिटिंग घेणे,शासनाच्या योजना त्यांच्यापर्यंत पोहोचवणे बँक लिंकेज ,उपजीविका वाढवणे,हे काम त्यांचे मेहनत जिद्द चिकाटीने काम करणाऱ्या आयसीआरपीचा सत्कार करण्यात आला उत्कृष्ट काम करणाऱ्या आय सी आर पी यांना सन्मान चिन्ह आणि साडी भेट म्हणून त्यांचा गौरव करण्यात आला या कार्यक्रमाला लाभलेले अध्यक्ष एम एस आर एल एम चे तालुका व्यवस्थापक मिलिंद चोपडे,प्रमुख वक्ते असलेले रिझर्व बिझनेस हेड नागपूर एचडीएफसी आशिष सहारे, उमेदअंतर्गत असलेले सीसी माननीय कोवे यांनी मार्गदर्शन केले,बी एम एम यू राजेंद्र खुरपुडे यांचे सुद्धा मार्गदर्शन लाभले प्रास्तविक भाषण संदीप एडोळे यांनी केले आशिष शहारे यांनी महिलांची संवाद साधण्यात आला चर्चा सत्रातून अतिशय मोलाचे मार्गदर्शन मिळाले, एच डी एफ सी बँकेचे खूप खूप आभार मानण्यात आले सूत्रसंचालनाचे काम आपटी आय सी आर पी कविता धुर्वे यांनी पार पाडले आभार प्रदर्शन दिनेश कोवे यांनी केले अशा पद्धतीने सत्कार पुरस्कार सोहळा पार पडला . उपस्थित एम एस आर एल एम ऑफिस स्टॉप मिलिंद चोपडे,धन्वंत शेंडे,राजेंद्र खुरपुडे,दिनेश कोवे,अविनाश तरडे,ज्ञानेश्वर जावळे,कवीश्वर लडी,कार्तिकी चांदोरे, प्रफुल पटेलपैक वैशाली पटेलपैक,वर्षा वाघळे,एच डी एफ सी कर्मचारी वर्ग आशिष शहारे,अमोल वैद्य,संदीप इंगोले,सचिन घाटे,लुकेश वैद्य,भारत पवार,अनिल खडसे,सागर झाडे,सचिन काकडे राळेगाव,वरध व वडकी क्लस्टर सर्व, आय सी आर पी उपस्थित होते.

## थोरा-मोठ्यांच्या जीवनातून विद्यार्थ्यांनी प्रेरणा घ्यावी -लोकनेते रामशेठ ठाकूर

**पान १ वरून**

वाय.टी. देशमुख, जे.एम. म्हात्रे, अरुणशेठ भगत यांनीदेखील स्वतःच्या शालेय जीवनातील विविध उदाहरणे देत शाळा व शिक्षणाचे महत्त्व सांगून विद्यार्थ्यांनी अधिक अभ्यास करावा यासाठी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर व विश्वनाथ कोळी, माजी पं.स. सदस्य रत्नप्रभा घरत, भाऊशेठ पाटील, न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच विजेंद्र पाटील, माजी उपसरपंच विजय घरत, अमर म्हात्रे, निलेश खारकर, भाऊ भोईर, वामन म्हात्रे, हेमंत ठाकूर, भार्गव ठाकूर, किशोर पाटील, शिक्षक पालक संघाचे अध्यक्ष कुंदन मोकल, उपाध्यक्ष नामदेव ठाकूर, सुहास भगत, सुधीर ठाकूर, कमलाकर देशमुख, विनायक कोळी, सुदर्शन घरत, महेश घरत, रामदास पाटील, योगिता भगत, उषा देशमुख, मीनाक्षी पाटील, निकिता खारकर, सुजाता पाटील, अमर घरत, जयवंत देशमुख, रोशन म्हात्रे, सागर ठाकूर, गोपाळ भगत, बी.टी. कांबळे, पी.के. ठाकूर, गव्हाण विद्यालयाच्या प्राचार्य ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख संजय उगले, मोरू नारायण म्हात्रे विद्यालय व टी.एन.घरत जुनिअर कॉलेज ऑफ सायन्सच्या मुख्याध्यापिका सायली वडवळकर, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख प्रणिता गोळे, पर्यवेक्षक अरुण जोशी तसेच संस्थेच्या फुंडे येथील ज्युनिअर कॉलेजचे विभाग प्रमुख बाबुलाल पाटोळे, राजू खेडकर आणि गव्हाण पंचक्रोशीतील शिक्षणप्रेमी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार रवींद्र भोईर यांनी मानले

## दोन लाख 48 हजारांची ऑनलाईन फसवणूक

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल** : ऑनलाईन पार्ट टाइम जॉब साठी आणि प्रोडक्टच्या प्रमोशन करायचे सांगून पाच टक्के कमिशन मिळण्याचे आमिष दाखवून दोन लाख 48 हजारांची ऑनलाईन फसवणूक केल्याप्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात अनोळखी ईसमाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. कामोठे साई प्रतिमा सोसायटी येथील 38 वर्षीय इसम यांना टेलीग्रामवर एक संदेश आला आणि समोरून लिंक पाठवली. यावेळी प्रॉडक्ट प्रमोशन केल्यावर पाच टक्के कमिशन देण्यात येईल असे सांगितले गेले. यावेळी त्यांना टेलिग्राम ग्रुप मध्ये जॉईन करण्यात आले आणि त्यांना दहा हजार रुपये रक्कम जमा करण्यास सांगितली. त्यांनी रक्कम जमा केली. यावेळी 30 वेगवेगळ्या प्रॉडक्टचा एक सेट दिला आणि प्रमोशन केल्यावर कमिशन मिळण्याचे आमिष दाखवले. त्यानंतर पुन्हा पैसे भरण्यास सांगितले असे एकूण त्यांनी दोन लाख 48 हजार 688 रुपये भरले. त्यानंतर पुन्हा चार लाख 81 हजार रुपये रक्कम भरण्यास सांगितली. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी अनोळखी इसमाविरोधात गुन्हा दाखल केला.

# महागांव येथे शासकिय इंग्रजी आश्रम शाळा होणार

### आदिवासी राज्यमंत्री नाईक यांचे आभार

**दैनिक युवक आधार**
**राजू गायकवाड**
**उमरखेड तालुका प्रतिनिधी**

> महागांव तालुक्यातील बहुतांश माझे आदिवासी विध्यार्थी हे शिक्षणापासून वंचित होते आता त्यांना आपल्याच महागांव तालुक्यात शिक्षण घेण्यास इंग्रजी माध्यमाची आश्रम शाळा होणार आहे आता आदिवासी विध्यार्थ्यांना इतरत्र कुठेही जाण्याची गरज भासणार नाही. विधार्थी हा शिक्षणाचा केंद्रबिंदू आहे आदिवासी समाजाचे उज्वल भविष्य आहे.
>
> **अँड सुनील ढाले**

महाराष्ट्र राज्यातील डोंगराळ व अतिदुर्गम भागातील आदिवासीमंधे शिक्षणाचा प्रसार व्हावा या हेतूने शासनाने सन 1972-73 पासून आश्रम शाळा योजना सुरु केली या योजनेतर्गत सध्या शासनामार्फत चालविल्या जाणाऱ्या 497 शाळा सुरु आहेत परंतु अमरावती विभागाअतर्गत पुसद आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या शासकीय आश्रम शाळा, बोरिवन ता. उमरखेड जि यवतमाळ हि आश्रम शाळा अपूर्ण विध्यार्थी संख्यमुळे बंद करण्यात आली होती मात्र आस्थापना कार्यरत आहे आदिवासी मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे या हेतूने महागाव येथे सुरु करण्याचा निर्णय हा शासनाने घेतला आहे सदर शाळा हि इंग्रजी माध्यमातून सुरु होणार पुसद प्रकलपात महागांव असा एकमेव तालुका आहे जिथे आदिवासी वसतिगृह नाही आश्रम शाळा नाही पण आता मात्र शाळा होणार यासाठी शासनाने हिरवी झेंडी दिली आहे यासाठी मा.आदिवासी राज्यमंत्री इंद्रनील भाऊ नाईक,आदिवासी विकास विभाग पुसद, विविध आदिवासी सामाजिक संघटना,आदिवासी सामाजिक कर्यकर्ते यांचा मोठा वाटा. बहू प्रतीक्षेनंतर आता महागाव आदिवासी बांधवांकडून राज्यंत्री इंद्रनील नाईक व विविध समाजिक संघटनांचे पदाधिकाऱ्यांचे मनपूर्वक अभिनंदन केल्या जात आह.

## सोन्याची चैन घेऊन पळून गेलेल्या आरोपीला अटक

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : मार्च महिन्यात आकुर्ली येथील सलूनमध्ये दाढी करताना फिर्यादीच्या गळ्यातील चेन घेऊन पसार झालेल्या असगर अली या आरोपीला खांदेश्वर पोलिसांनी एक जुलै रोजी सिद्धार्थ नगर, उत्तर प्रदेश येथून अटक केली. न्यायालयाने त्याला पोलीस कोठडी सुनावली आहे.

सिद्धार्थ मोरे हे आकुर्ली येथे राहत असून गुरु रेसिडेन्सी येथे सलूनवाला असगर अली मुस्तकीन सलमानी याच्याकडे ते दाढी करण्यासाठी गेले होते. 17 मार्च रोजी दाढी करत असताना त्यांची चैन घेऊन असगर अली पसार झाला. खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केल्यानंतर पोलीस उपनिरीक्षक सोमनाथ मदने, पोलीस हवालदार जयवंत यादव, मुबारक तडवी यांनी त्याला उत्तर प्रदेश येथून ताब्यात घेतले या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

## घरफोडी करून मोटरसायकल आणि रोख रक्कम दागिन्यांची चोरी

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

नांदगाव येथे घरफोडी करून चोराने रोख रक्कम, सोन्याचे दागिने आणि मोटरसायकल चोरून नेली. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

हरेंद्र भगत हे नांदगाव येथे राहत असून 28 जून रोजी ते रात्री साडे अकराच्या दरम्यान खाली असलेल्या घराला लॉक लावून सर्वजण राहत्या ठिकाणी झोपी गेले होते. 29 जून रोजी सकाळी पावणेसहा वाजता उठल्यानंतर ते तळमजल्यावर घरी आले आणि घराच्या दरवाजाला लावलेले लॉक तुटल्याचे दिसले. आत जाऊन पाहणी केली असता रोख रक्कम 50 हजार रुपये, सहा ग्राम वजनाची एक जोडी कुडी दिसली नाही. घराच्या बाहेर पाहिले असता अंगणात ठेवलेली स्प्लेंडर मोटरसायकल दिसून आली नाही चोरांनी ती चोरून नेली.

# अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद आयोजित पत्रकारिता पुरस्कार वितरण सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत थाटात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर):**

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने दरवर्षी पत्रकारितेच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पत्रकारांना विविध पुरस्कार देऊन मान्यवरांच्याहस्ते सन्मान करण्यात येते. त्याचप्रमाणे सन २०२४ च्या पुरस्काराचे वितरण समारंभ मुंबई मराठी पत्रकार संघ, पत्रकार भवन येथे आयोजित करण्यात आले होते. बुधवारी संध्याकाळी पार पडलेल्या या सोहळ्यात ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांना बाळशास्त्री जांभेकर जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.




या सोहळ्याला माजी केंद्रीय मंत्री खासदार शरद पवार, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, ज्येष्ठ विचारवंत अर्थतज्ञ डॉ. नरेंद्र जाधव, सुप्रसिद्ध मराठी सिने अभिनेते भरत जाधव, कामगार नेते महेंद्र घरत, अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख, अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, विश्वस्त किरण नाईक, शरद पाबळे, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस प्रा.सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूरभाई शेख, अनिल वाघमारे, शोभा जयपूरकर, विशाल परदेशी, दीपक कैतके, राजा आदाटे, संजय मिश्कीन, विनायक सानप, दीपक पवार, पांडुरंग म्हस्के आदी पदाधिकारी उपस्थित होते. या सोहळ्यात अभिनेता भरत जाधव यांचा विशेष सन्मान करण्यात आला. त्याच प्रमाणे पत्रकारितेच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महेश म्हात्रे, अभिजित करांडे, अमेय शिरोडकर, पांडुरंग पाटील, सर्वोत्तम गावरस्कर, दिनेश केळुस्कर, सीमा मराठे, बाळासाहेब पाटील, शर्मिला कलगुटकर, भरत निगडे आदींना विविध मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

# श्री अर्जून नेटके सरांचा सेवापूर्ती गौरव सोहळा

**दैनिक युवक आधार**
**शिरूर कासार**
**वार्ताहर**

येथील कालिकादेवी माध्यमिक विद्यालयात,'इंग्रजी विषयाचे श्री,अर्जून कोंडीराम नेटके सर,नियत वयोमानानुसार दि.३० जून २०२५ सोमवार रोजी सेवानिवृत झाले. त्यानिमित्त प्राचार्य केशव भांगे साहेब यांनी अर्जून नेटके सरांच्या सेवापूर्तीचा गौरव सोहळा आयोजित केला होता. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य केशव भांगे साहेब, प्रमुख पाहुणे माजी प्राचार्य सुधाकर खोले, कोळवाडीचे सरपंच देवीस नेटके, उपसरपंच श्री मानकर यांच्या हस्ते लोकनेत्या स्व. केशरबाई(काकू)क्षीरसागर व स्व.सोनाजीराव(नाना)



क्षीरसागर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरूवात झाली. प्रमुख पाहुण्यांच्या सत्कारा बरोबरच सत्कारमूर्ती श्री,अर्जून कोंडीराम नेटके,आणि त्यांच्या पत्नी सौ.सरस्वती अर्जून नेटके,यांचा सपत्नीक कपड्यांचा आहेर आणि पुष्पहार,शॉल,श्रीफळ,हार व बुके देऊन प्राचार्य भांगे साहेबांच्या हस्ते सत्कार करून त्यांच्या ३३ वर्ष सेवेचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक उपप्राचार्य बसवेश्वर देशमाने यांनी केले.व आपल्या मनोगतातून त्यांनी कार्यक्रमाचे स्वरूप,सांगितले तर प्रमुख पाहुणे मा.सुधाकर खोले सरांनी शैक्षणिक क्षेत्रातील विविध अनुभव सविस्तरपणे सांगितले.तर अध्यक्षीय भाषणातून प्राचार्य भांगे साहेबांनी अर्जून नेटके सरांच्या प्रदीर्घ सेवेचा सन्मान व गौरव करतांना सांगितले की, इंग्रजी सारखा अवघड विषय विद्यार्थ्यांना सोप्या पध्दतीने शिकविला. त्याच बरोबर संस्काराची पण धडे दिले.अशा अनेक पिढ्या त्यांनी घडविल्या.आणि यशस्वीपणे आपली सेवा पूर्ण केली.यानंतर ही त्यांनी आपल्या आयुष्याची वाटचाल योग्य दिशेने करून आपले जीवन सुखी,आनंदी व संपन्न करावे अशी अपेक्षा व्यक्त करून पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. या प्रसंगी नेटके सरांच्या आई इंद्रायणीबाई,मुलगी प्रा.शारदा चव्हाण,जावई प्रा.वैभव चव्हाण, मुले महेश व तान्हाजी, व्याही भारत चव्हाण व गावातील जेष्ठ नागरिक,नातेवाईक, मित्रमंडळी यांची विशेष उपस्थिती होती.तसेच विद्यालयातील,सांस्कृतिक विभाग प्रमुख,जयेंद्र निकम,आबासाहेब ढवळे,रविंद्र बडे,बाळासाहेब येवले,वसंत आहेर,राजू बडे, आप्पासाहेब कांबळे,नितीन बहिर,रोहित शिराळे,रविंद्र गव्हाणे,सुंदर शिंदे,अक्षय साळवे,जितेश उगलमुगले,तसेच उच्च माध्यमिक विभागातील परीक्षा प्रमुख प्रा.नामदेव तरकसे,प्रा. नारायण घोलप,प्रा.अशोक इनकर,प्रा.संजय आव्हाड,प्रा. अनिल जरे,प्रा.प्रशांत मळेकर,प्रा. महारूद्र डोंगरे,प्रा. बिभिषण घायाळ,प्रा.महादेव हांगे,प्रा.दत्ता गायकवाड,प्रा. लक्ष्मण गव्हाणे,प्रा.नारायण तांबे,प्रा.विश्वास ढाकणे,प्रा. दत्ता शिंदे,डॉ.सत्यनारायण ढवळे,डॉ.अशोक घोडके,प्रा. अशोक सवासे,प्रा. घनश्याम चव्हाण,प्रा. शशिकांत जावळे,प्रा.सुनिल मोरे,प्रा.हनुमंत घायाळ,प्रा. बाळासाहेब खटाणे,प्रा.अक्षय रणखांब,प्रा.अमर खोले, आदिनाथ काशिद,सुनिल खेडकर, विलास कांबळे,गौतम भोसले,दत्ता शिंदे,श्रीमती कुसुमबाई ढिसले इत्यादिंची उपस्थिती होती.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.विनोद गलांडे यांनी केले,तर आभार प्रदर्शन डॉ.आत्माराम झिंजुर्डे यांनी केले.यावेळी विद्यालयातील सर्व कनिष्ठ प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शासकीय भूखंडाच्या पुनर्विकास सरकारी कर्मचारी च्या समितीवर विशेष निमंत्रित सदस्य पदी "सुहास आडिवरेकर व महेश पारकर"यांची नियुक्ती

**दैनिक युवक आधार**
**मुंबई प्रविणभाऊ पवार**




मुंबई वांद्रे पूर्व येथील सर्वे क्रमांक ३२९, न. भू. क्रमांक ६२९/१२३४/अ/१ या शासकीय भूखंडाचा पूर्नर्विकास करण्याचा करण्याचा निर्णय शासनाकडून घेण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने वांद्रे येथील शासकीय वसाहतीतील दिर्घकाळ वास्तव्यास असलेल्या शासकीय अधिकारी / कर्मचारी / कर्मचाऱ्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेला उपरोक्त संदर्भाधीन शासन निर्णयान्वये बांद्रा शासकीय वसाहती मधील भूखंड देण्यात आला आहे. सदर भूखंडाचा तपशील अधिकारी / कर्मचारी / कर्मचाऱ्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्था यांची अर्हता / निकष निश्चित करण्यासाठी व इतर निर्णय होण्यासाठी मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली. या समिती मध्ये स्थानिक पदाधिकारी कोकण विकास आघाडी मुंबई चे अध्यक्ष व मुंबई भाजपा उपाध्यक्ष श्री. सुहास आडिवरेकर व मुंबई भाजपा सचिव श्री. महेश पारकर यांची विशेष निमंत्रित सदस्य म्हणून नियक्ती करण्यात आली आहे. या नियुक्ती बदल स्थानिक नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. वांद्रे पूर्व विधानसभा स्थानिक जनतेकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

**दैनिक युवक आधार** हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# प्रशिक एज्युकेशन सोसायटीच्या वतीने स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी मार्गदर्शन शिबिर संपन्न

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

प्रशिक एज्युकेशन सोसायटीचे वतीने हौसाबाई आठवले स्मरणार्थ यूपीएससी एमपीएससी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र चालविण्यात येते. या उपक्रमांतर्गत पार्वतीबाई महादेव सावळेकर रोटरी सभागृह येथे छत्रपती शाहू महाराज जयंती व विद्यार्थी मार्गदर्शन प्रशिक्षण शिबीर २ जुलै आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाला केंद्रीय समाज कल्याण राज्यमंत्री रामदास आठवले उपस्थित होते. तर पनवेलचे सहाय्यक पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले यांनी विद्यार्थ्यांना ओघवत्या शैलीमध्ये मार्गदर्शन केले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते सय्यद अकबर, काँग्रेस नेते अरविंद सावळेकर, आरपीआय रायगड जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड, प्रभाकर गायकवाड उपस्थित होते. यावेळी दहावी परीक्षेमध्ये चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार




करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना संबोधित करताना रामदास आठवले म्हणाले की डॉ. बाबासाहेब आंबेडकर नेहमी म्हणायचे की जर तुमच्याकडे दोन रुपये असतील तर त्यातील एक रुपयाची भाकरी घ्या आणि एक रुपयाचे पुस्तक घ्या. भाकरी तुमची आजची भूक मिटवेल पण पुस्तकातून मिळणाऱ्या शिक्षणामुळे तुम्ही अनेकांची भूक मिटविण्याचे कसब जिंकाल. ते पुढे म्हणाले की शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. शिक्षण मिळवून देत गरजवंत विद्यार्थ्यांना मूळ प्रवाहात आणण्याचा जो मार्ग बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्याला दाखविला आहे त्याच मार्गावर मोहन गायकवाड मार्गक्रमण करत असल्याबद्दल मला त्यांचा अभिमान वाटतो. सहाय्यक पोलिस आयुक्त भाऊसाहेब ढोले यांनी आपली शाळा म्हणजे शिक्षणाचे पायाक्षेत्र हे भक्कम असले पाहिजे. कोणत्याही क्षेत्रामध्ये करियर घडवायचे असेल तर गणित आणि इंग्रजी या विषयावरती आपला पगडा मजबूत हवा. माझे आजोबा मुख्याध्यापक होते. गणित आणि इंग्रजी विषयांमध्ये ते अत्यंत पारंगत असल्याचे सांगत उपरोक्त विचार त्यांनीच माझ्या मनामध्ये रुजवला असे सांगितले. त्यामुळे शालेय जीवनामध्ये आपल्या आई-वडिलांचा आदर करणे ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. यावेळी सय्यद अकबर म्हणाले की आज शैक्षणिक वर्षाची सुरुवात होत असताना अनेक ठिकाणी सामाजिक कार्यक्रमांची रेलचेल पाहायला मिळते. परंतु कित्येक कार्यक्रम केवळ लोकप्रियतेसाठी आयोजित केलेले असतात. अशा सगळ्या लोकांनी मोहन गायकवाड यांचा आदर्श डोळ्यापुढे ठेवला पाहिजे. आपल्या देशाची पुढची पिढी घडविण्याच्या दृष्टीने स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र आणि मार्गदर्शन शिबिर अत्यंत महत्वाची कामगिरी बजावत असतात.

## इनरव्हील क्लब ऑफ पनवेलतर्फे वृक्षारोपण उपक्रमाद्वारे नवीन वर्ष २०२५–२६ च्या प्रकल्पांची सुरुवात

**दैनिक युवक आधार**
**पनवेल(प्रतिनिधी)**

इनरव्हील क्लब ऑफ पनवेलच्या २०२५–२६ या नवीन वर्षातील सामाजिक उपक्रमांची सुरुवात वृक्षारोपण उपक्रमाने करण्यात आली. पनवेल महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने आणि सौजन्याने आयटीआय कॉलेज ते तक्का उड्डाणपूल परिसरात क्लबच्या सदस्यांनी २५ विविध प्रजातींची झाडे लावली. पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त मा. मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त मा. गणेश शेटे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, सहाय्यक आयुक्त डॉ. रूपाली माने तसेच विभागप्रमुख अनिल कोकटे यांच्या मार्गदर्शनाखाली महानगरपालिका विविध सामाजिक संस्था व नागरिकांसाठी मोफत रोपे वाटप कार्यक्रम राबवत आहे.




या उपक्रमाला नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. इनरव्हील क्लबच्या वृक्षारोपण प्रकल्पाच्या यशस्वी आयोजनासाठी महानगरपालिकेच्या उद्यान विभागाचे पर्यवेक्षक सिद्धार्थ कांबळे, उद्यान पर्यवेक्षक किरण गायकवाड, गजलक्ष्मी आंब्रे तसेच अन्य कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले. या प्रसंगी इनरव्हील क्लब ऑफ पनवेलच्या अध्यक्षा शुभांगी पिंपळकर, सचिव डॉ. अमृता नाईक, खजिनदार अवंतिका मारुलकर, प्रकल्प अध्यक्षा सुलभा निंबाळकर तसेच सदस्य सौ. सुनीता जोशी, डॉ. पत्की, संजीवनी मालवणकर आदी मान्यवर उपस्थित होते. इनरव्हील क्लब ऑफ पनवेलने पर्यावरण संरक्षण, हरित क्षेत्र संवर्धन आणि सामाजिक जबाबदारी या हेतूने पुढील वर्षभरात विविध उपक्रम राबवण्याचा संकल्प केला आहे.

## लक्ष्मण निदानकर यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन.

**दैनिक युवक आधार**
**गिरमाजी सुर्यकार धर्माबाद**



**धर्माबाद :** गिरमाजी सुर्यकार तालुक्यातील मौजे बन्नाळी येथील रहिवासी तथा ग्राम पंचायत सरपंच प्रतिनिधी व सदस्य व सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मण लक्ष्मण निदानकर (वय 56 वर्षे) यांचे दि. 3 जूलै 2025 रोजी सकाळी 9 वाजता हृदयविकाराच्या तिव्र झटक्याने दुःखद निधन झाले आहे. लक्ष्मण निदानकर हे अतिशय मनमिळाऊ स्वभावाचे होते प्रत्येकाशी अतिशय नम्रपणे वागत. सामाजिक व राजकिय क्षेत्रात त्यांचे मोलाचे योगदान होते. एक प्रामाणिक व धाडसी कार्यकर्ता म्हणून त्यांची ओळख होती. त्यांच्या प्रामाणिकपणामुळे बन्नाळी येथील गावकयांनी त्यांची पत्नी सौ. सुरेखा लक्ष्मण निदानकर यांना बन्नाळी येथील सरपंचपदी विराजमान करुन त्यांच्या प्रामाणिकपणाची पावती दिली होती. मागील काही महिण्यात त्यांच्यावर अनेक संकटे आली होती. दोन वेळा त्यांचा अपघात झाला होता त्यातही ते न खचता धैर्याने संकटाला तोंड दिले. परंतु दि. 3 जूलै 2025 रोजी सकाळी अंदाजे 9 वाजता साठे नगर धर्माबाद येथील त्यांच्या राहत्या घरी हृदयविकाराचा तिव्र झटका आला होता. ग्रामीण रुग्णालय धर्माबाद येथे आणले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. शवविच्छेदनानंतर सायंकाळी 6 वाजता वैकुंठधाम सार्वजनिक स्मशानभूमीत त्यांच्यावर अंतिम संस्कार करण्यात आले. यावेळी मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

# वडाळा गावचे तीर्थक्षेत्र 'श्रीप्रतिपंढरपूर'

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

आषाढी एकादशी म्हणजे पंढरीचा मानाचा दिवस. आपल्या या विठुरायाचे दर्शन घेण्याच्या लगबगीने सारे वारकरी वारी करीत पंढरीची पायी वाटचाल करीत असतात. टाळ मृदुंग, ग्यानबा- तुकाराम, जय हरी विठ्ठल जय जय विठ्ठल या जयघोषात या विठुरायाचे नामस्मरण करीत वारकरी विठ्ठलाच्या नामस्मरणात लीन होताना दिसतात.

प्रत्येक विठ्ठलभक्ताला आपल्या देवाचे दर्शन व्हावे असे वाटत असते. परंतु प्रत्येकालाच वारीला जाण्याची संधी मिळेलच असे नाही. असंच मुंबईकरांच्या बाबतीत काही दिसून येते. मुंबई मधील भक्तांना या विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपूरला जाणे शक्य होत नाही. अशावेळी हे भक्त मुंबईतील वसलेल्या वडाळा गावांत " प्रतिपंढरपूर " या मंदिरात वारी काढतात. मुंबईतील पंढरीत टाळ मृदुंगाचा नाद, वैष्णवांचा मेळा, भगवा पताका, विद्युत रोषणाई हे सारे दृश्य पाहायला मिळते. अशाच मुंबईतील प्रसिद्ध प्रतिपंढरपूर " म्हणजेच वडाळा गांवातील विठ्ठल रुक्मिणी मंदिर. मंदिराचा विस्तार वाढवण्यात आला असून मंदिराचा कळस हा भागवतभक्त सोनोपंत दांडेकर यांनी बसवला होता असे सांगितले जाते. मुंबईतील ज्यांना पंढरपूर येथे जाणे शक्य होत नाही, त्यांच्यासाठी हे मंदिर एक प्रतिपंढरपूर म्हणून उभे आहे. मंदिरात आषाढी एकादशीला लाखो भाविकांची गर्दी दिसून येते. मुंबईतील कुलाबा आणि अनेक ठिकाणाहून येथे वारक-यांच्या दिंड्या येतात. जत्रेचा उत्साह ही असतो. असे हे मंदिर पूर्वाभिमुख असून संपूर्ण संगमरवरी आहे. मंदिरात प्रथम प्रवेश करताना आपल्या नजरेस पडते ती काळ्या पाषाणातील गरुड देवाची मूर्ती, बाजूला शनी देवाचे मंदिर, आत गेल्यावर श्री. मारुतीरायाची मूर्ती, पुढे गेल्यानंतर मुख्य गाभा-यात दर्शन घडते सुंदर काळ्या पाषाणातील विविध आभूषणे आणि अलंकाराने नटलेली विठ्ठल-रखुमाईची मूर्ती. या मंदिरच्या उजव्या बाजूला महादेवाचे मंदिर असून डाव्या बाजूला श्रीदत्त, देवीचे गणपतीचे मंदिर आहे, मंदिरात पहाटे काकड आरती, दुपारी १ आणि सायंकाळी ७ वाजता आरती तर रात्री ९.३० वाजता शेजारती होत असून दररोज सायंकाळी ५ ते ७ वाजता आणि रविवारी ४ ते ७ हरिपाठ प्रवचन असा हा मंदिराचा कार्यक्रम असतो. दशमीपासून भजन सुरु होऊन ते आषाढी एकादशीच्या रात्री पर्यंत भजन सुरु असते. आषाढीला लाखो वैष्णवांचा मेळा भरतो संपूर्ण मंदिर हरिनामाच्या जपाने दुमदुमून जातो. मंदिरातील विठ्ठल रखुमाईच्या मूर्तीची पूजा आषाढी एकादशीला राजकीय पुढारी व्यक्तींच्या हस्ते केली जाते.

मुंबईतील प्रसिद्ध मंदिरांपैकी हे एक विठ्ठल रुक्मिणी मंदिर. मंदिर पुरातन असून जवळ जवळ ४०० वर्षे जुने आहे. या मंदिराच्या स्थापनेविषयाची गोष्ट ऐकण्यासारखी आहे. पूर्वी मुंबई हि सात बेटांची होती. त्यातील वडाळा हे एक बेट किंवा गांव. वडाळा गांव हे प्रसिद्ध होते, ते येथील मिठागरांसाठी. अशा या मिठागरात लमाणी, शेतकरी, कोळी, आगरी अशी अनेक लोक राहत होते. मिठाचा व्यापार करणे या त्यांचा व्यवसाय. व्यापार करणारे




व्यापारी हे विठ्ठलाचे आणि तुकाराम महाराजांचे भक्त असून ते नित्यनियमाने वारीला पंढरपूरला जात असे. एक दिवशी काम करताना या मिठागरात काम करणा-या विठ्ठल- रखुमाईच्या मूर्ती सापडल्या. सदर घटना व्यापा-यांनी पंढरपुरास जाऊन तुकाराम महाराजांना सांगितली असे म्हणणे आहे, त्यांनी सांगितले या मुर्त्या ज्या ठिकाणी सापडल्या त्या ठिकाणी विठ्ठल-रखुमाईचे मंदिर स्थापन करा. व्यापा-यांनी त्या परिसरात एक तळ होतं तेथे मंदिर उभारले. मंदिराचा विकास होत गेला तस तसे या मंदिराचा पाय रचत गेला. आणि आज या मंदिरात गेल्यावर समाधान मिळाल्याशिवाय बाहेर येऊच शकत नाही. ही खरी मंदिराची ख्याती आहे. म्हणून हे विठ्ठल रुक्मिणी मंदिर "प्रतिपंढरपूर " तीर्थक्षेत्र म्हणून ओळखले जाते.

## आदिल पठाण' यांना राज्यस्तरीय बहुजन रत्न पुरस्कार जाहीर.!

**दैनिक युवक आधार**
**चिखली शहर प्रतिनिधी**
**सिद्धार्थ धंदारे**



देऊळगाव राजा तालुक्यातील ग्रामीण भागातून आलेले ,सामाजिक व सांस्कृतिक ,आणि पत्रकारिता क्षेत्रात आपल्या लिखाणाच्या व वक्तृत्वाच्या जोरावर एक वेगळी कामगिरी करत सामाजिक कार्याला प्रथम स्थान देत गेल्या अनेक वर्षांपासून कार्यरत असलेले पत्रकार सामाजिक कार्यकर्ते शब्दनायक वृत्तपत्र संपादक ADV आदिल पठाण यांना बहुजन रत्न पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.पत्रकारिता क्षेत्रात असून ही आदिल पठाण यांनी सामाजिक बांधिलकी कधी सोडली नाही. बहुजन महापुरुषांच्या समतावादी विचारांचा जागर करत मी आणि माझे, या पलीकडे जाऊन विविध सामाजिक कार्यात त्यांनी सक्रिय सहभाग घेतला आहे. निस्वार्थ राजकारण, निगर्वी पणा, जमिनीवर पाय ठेवून वावरणे, जनसामान्यांचे सुखदुःखाशी घट्ट नाळ ,समाजातील ज्वलंत प्रश्नावर निर्भीड पणे लिखाण करणे,स्पष्टवक्ते पणा, यामुळे यांचा चाहता वर्ग राजकारणा पलीकडे केव्हाच गेला आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत ऋणानुबंध समाज विकास संस्था यांच्या वतीने त्यांना राज्यस्तरीय बहुजन रत्न पुरस्कार जाहीर केला आहे. लवकरच सदर पुरस्कारचे वितरण चिखली येथे केले जाणार असल्याचे संस्थेच्या वतीने कळविण्यात आले आहे.

## शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे शाखा प्रमुख हे महत्वाचे दुवे आहेत - शिवसेना नेते तथा माजी केंद्रीय मंत्री अनंत गीते

**दैनिक युवक आधार**
**पनवेल ( वार्ताहर )**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे शाखा प्रमुख हे महत्वाचे दुवे आहेत. त्यामुळे आगामी निवडणुकीत त्यांनी पूर्ण ताकतीनिशी कामाला लागावे असे आवाहन शिवसेना नेते तथा माजी केंद्रीय मंत्री अनंत गीते




यांनी पनवेल येथे आयोजित पनवेल महानगर क्षेत्रातील सर्व शाखा प्रमुखांच्या मेळाव्यात मार्गदर्शन करताना केले . शिवसेना नेते तथा माजी केंद्रीय मंत्री अनंत गीते यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये व मार्गदर्शनाखाली शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या पनवेल महानगर क्षेत्रातील सर्व शाखा प्रमुखांचा मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.यावेळी शिवसेना उपनेते सुरेन्द्रनाथ (बाळ) माने , उपनेते बबनदादा पाटील, रायगड जिल्हा संपर्क प्रमुख प्रसाद भोईर , शिवसेना जिल्हाप्रमुख रायगड शिरीष घरत , अवधेश शुक्ला, उपजिल्हाप्रमुख भरत पाटील, उपजिल्हाप्रमुख रामदास पाटील, विधानसभा समन्वयक प्रदीप ठाकूर ,महानगर समन्वयक दिपक घरत, महानगर प्रमुख अवचित राऊत, शहर प्रमुख रामदास गोवारी, शहर प्रमुख सदानंद शिर्के, शहर प्रमुख यतीन देशमुख, शहर प्रमुख सूर्यकांत म्हसकर, शहर प्रमुख प्रवीण जाधव यांच्यासह सर्व शाखा प्रमुख मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महेंद्र पाटील यांची कल्याण मधील अनधिकृत शाळेंवर कारवाई करण्याची मागणी.

**दैनिक युवक आधार**
**कल्याण ग्रामिण प्रतिनिधी**
**रमेश राऊत**

तालुक्यासह संपूर्ण ठाणे जिल्ह्यात अनधिकृत शाळांचे प्रमाण भरपूर प्रमाणात वाढत चालले आहे. शिक्षणाधिकारी आणि राजकारणी यांच्या साठ्या-लोट्यानं या अनधिकृत शाळा चालू असल्याचे बोलले जात आहे. ठाण्यातील मुंब्रा, दिवा आणि डोंबिवलीतील काही अनधिकृत शाळांची यादी जाहीर करून सुद्धा त्या शाळेंवर अजून पर्यंत कुठलीही कार्यवाही झालेली दिसत नाही. कल्याण तालुक्यातील ग्रामीण भागात सुद्धा अशाच प्रकारे अनधिकृत शाळेच्या जाळे पसरले आहे. या अनधिकृत शाळेवर कारवाई करण्याची मागणी डोंबिवलीतील निळजे गाव येथील बहुउद्देशीय



सामाजिक संस्थेचे सचिव श्री महेंद्र वसंत पाटील यांनी कल्याण पंचायत समितीच्या गट शिक्षणाधिकारी सौ. रुपाली खोमणे यांच्याकडे केली आहे. काही अनधिकृत शाळा चालकांनी बालवाडीच्या नावावर पहिली ते दहावीचे वर्ग सुरू केले आहेत यामुळे पालकांची फसवणूक तसेच विद्यार्थ्यांच्या भविष्याचे ही मोठे नुकसान होते म्हणून ठाणे जिल्हा परिषद आणि पंचायत समितीने अशा शाळा शोधून त्यांच्यावर त्वरित कारवाई करून फौजदारी गुन्हे दाखल करावे अशी मागणी महेंद्र वसंत पाटील यांनी केली आहे.

# १९८९-९० बी. ए. ग्रुपची पावसाळी सहल ऐतिहासिक महालमिरा डोंगरावर : 'महालमिरा 'पर्यटन स्थळ म्हणून विकसित व्हावे, शासनाकडे मागणी.


**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी**

स्वामी विवेकानंद आर्ट्स आणि कॉमर्स कॉलेज पेणचे १९८९-९० बी. ए बॅचचे मित्र मैत्रीणी कॉलेज संपल्यानंतर सन २०१९ मध्ये सोशल मिडिया च्या माध्यमातून तब्बल २८ वर्षांने एकत्र भेटले. तेव्हा पासून गेली ७ वर्षे या मैत्री परिवाराचे वर्षातून एकदा स्नेहसंमेलन व एकदा पावसाळी पिकनिक आयोजित करण्यात येते. भूतकाळातील कॉलेज चे मंतरलेले दिवस पुन्हा एकदा नव्याने जगण्यासाठी, गोड आठवणी ताज्या करण्यासाठी, प्रत्येकाच्या वाटा वेगळ्या दिशा वेगळ्या तरीही ठरविलेल्या दिवशी हि मित्र मैत्रिणींची टोळी जमते व मनमुराद आनंद लुटत असते. बुधवार दिनांक २ जुलै रोजी महालमिरा व्याघ्रेश्वर येथे शिवकालीन ऐतिहासिक मंदीर श्री क्षेत्र व्याघ्रेश्वर येथील निसर्ग रम्य ठिकाणी या बी ए ८९-९० ग्रुपची पावसाळी पिकनिक आयोजित करण्यात आली होती. महालमिरा डोंगरावरील श्री क्षेत्र व्याघ्रेश्वर हे शिवकालीन शिवमंदिर आहे. या मंदिराचा इतिहास म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांनी ज्यावेळी सुरत चा खजिना लुटला त्यावेळी ते कल्याण मार्गे आले व येताना महाल मीरा डोंगरावरून आले व तिथून तो खजिना रायगडावर



गेला होता. असे हे शिवकालीन शिवमंदिर आहे. त्याचप्रमाणे येथील डोंगर रानात मिरी व कोकम मिळत असत. नैसर्गिकरित्या उगवलेले मिरी मिळत असल्याने या डोंगराला "महालमिरा " असे संबोधले जाते. आणखीन एक गोष्ट सांगितली जाते की, या डोंगरात वाघाचा वावर होत असे .एका भव्य शिळेजवळ वाघ येत असे ती शिळा अजूनही या परिसरात आहे. त्यामुळे हे ठिकाण व्याघ्रेश्वर नावाने ओळखले जाते. अशा या नयनरम्य निसर्गाचे विहंगम दृश्य सर्वानी आपल्या डोळ्यांत टिपले. येथील धबधब्यांच्या विस्तृत प्रवाहाखाली सर्वांनी भिजण्याचा मनसोक्त आनंद लुटला. ग्रुप कडून मंदिर परिसर स्वच्छ करण्यात आला.दुपारी स्वादिष्ट जेवणानंतर सर्वांनी आपल्या परतीच्या प्रवासासाठी मार्गक्रमण केले. अशी हि उत्साही पिकनिक यशस्वी होण्यासाठी उपस्थित सर्व मित्र मैत्रीणींनी विशेष योगदान दिले. अशा या भटकंती मधुन एक महत्त्वाची गोष्ट निदर्शनास येत आहे की, अशा या निसर्ग देणगी असलेल्या महालमिरा व्याघ्रेश्वर या ऐतिहासिक शिवमंदिराकडे जाण्यासाठीचे रस्ते, मंदिराचा विस्तार, मंदिराचे पावित्र्य, सुशोभीकरण शासनाकडून करण्यात आले तर, या ऐतिहासिक शिवकालीन मंदिराचे जतन होईल, आणि महालमिरा व्याघ्रेश्वर हे पर्यटन स्थळ म्हणून विकसित केले तर येथील आदिवासी वस्तीला, स्थानिक रहिवासियांना रोजगार मिळेल. त्यांना उद्योग धंदे टाकण्यासाठीची संधी मिळेल. पेण तालुक्यातील हे 'मिनी माथेरान' आहे. पर्यटकांना आकर्षित करणारा निसर्ग आणि पर्यटकांना खुणावणारे सुंदर धबधबे येथे आहेत . त्यामुळे बी ए ८९-९० या ग्रुप कडून शासनाकडे मागणी आहे की, महालमिरा डोंगर रायगड मधील पेण तालुक्यातील हे ठिकाण एक महत्त्वाचे पर्यटन स्थळ म्हणून विकसित व्हावे व येथे सोयीसुविधा होण्यासाठी शासनाने लक्ष केंद्रित करावे.

# भाविकांसाठी ज्यूस वाटप



**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर :**

अपर्णा शहा संस्थापित "ईट प्ले रीड " ऑर्गनायझेशन माध्यमातून कामोठे येथे साई सरस्वती मंदिर येथे स्वामी जयराम देवाचार्य जी महाराज" यांचा स्वागत सोहळा पार पडला. याचे औचित्य साधून भाविकांसाठी ज्यूस वाटप करण्यात आले. कामोठे येथे साई सरस्वती मंदिरात स्वामी दर्शना साठी आलेल्या भाविकांसाठी " ईट प्ले रीड" संस्थेच्या संस्थापक अपर्णा शहा यांच्या मार्गदर्शनाखाली ज्यूस वाटप करण्यात आले जेणे करुण त्याना एनर्जी मिळावी शरीराला आतून थंडावा मिळावा. ईट प्ले रीडचा हा उल्लेखनीय प्रयत्न मोठ्या प्रमाणावर भाविकांकडून समुदायाकडून मान्यता आणि समर्थनास पात्र ठरला. भाविकांनी याचा मनमुरादपणे आनंद घेतला.

## गठबंधन ..

कसे बसे बांधले
अर्धवट गठबंधन
यशस्वी झाले हो
करावे अभिनंदन

शहाण्याशेजारीचं
बसले मूर्ख नंदन
अंतर्गत धुसफूसी
गुप्ततेत रणकंदन

काल जे होते शत्रू
त्यांना करा वंदन
घनिष्ठ दोस्तांनाचं
लावून टाक चंदन

मान्यनाही मनाले
तरी दे अनुमोदन
सारेजण अस्वस्थ
कसे करी प्रबोधन

विजोड जरीजोडी
म्हणतातरतिमदन
जोडे दुजा घरोबा
सोडे आपले सदन

गाड्यांची रांगभली
उरलेले शून्य इंधन
जमताजमेना मुळी
रे चत्वारिअनुबंधन

**- हेमंत मुसरीफ, पुणे**

# विविध योजनांमधील होणाऱ्या भ्रष्टाचाराची चौकशी करून दोषींवर कार्यवाही करा. राजू शिंदे

**दैनिक युवक आधार**
**जालना/ जिल्हा प्रतिनिधी**
**अशोक ठोके**

शासनाच्या विविध योजना व प्रकल्पांच्या अंमलबजावणी दरम्यान होणाऱ्या गंभीर गैरप्रकारांविषयीची चौकशी करून कार्यवाही करण्यात यावी या मागणीचे निवेदन माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समितीचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष राजू शिंदे व कमिटीच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी जालना व जिल्हाधिकारी पांचाळ यांना दिले आहे. दिलेल्या निवेदनात त्यांनी खालील मागण्या केल्या आहेत.





1. जालना जिल्ह्यातील पंतप्रधान आवास योजना 2025 अंतर्गत नोंदणीसाठी लागणाऱ्या जॉब कार्डसाठी स्थानिक ग्राहक सेवा केंद्र चालकांकडून प्रतिव्यक्ती 300 ते 500 रुपये इतकी अनधिकृत रक्कम आकारली जात आहे.
2. घरकूल योजनेची नोंदणी करण्यासाठी देखील 200 ते 500 रुपये इतकी मागणी होत असून, महाराष्ट्र शासनाने या नोंदणीस कोणतीही फी आकारू नये असे आदेश दिलेले असतानाही ही मागणी सुरू आहे.
3. सन 2023-24 मध्ये मंजूर झालेल्या घरकुलांसाठी संबंधित घरकुल निरीक्षकांकडून प्रति लाभार्थी 10000 ते 20000 रुपये इतको लाच घेतली जात आहे.
4.जे लाभार्थी खरंच घरकुल बांधू इच्छितात त्यांची मुद्दामहून अडवणूक केली जाते व लाच दिल्याशिवाय कामे पूर्ण केली जात नाहीत.
5. काही लाभार्थ्यांनी प्रत्यक्षात घरकुल बांधलेले नसताना, बनावट कागदपत्रे तयार करून, दुसऱ्या व्यक्तीचे घर दाखवून शासनाच्या घरकुल अनुदानाची पूर्ण रक्कम त्यांच्या खात्यात जमा केली आहे. यासाठी 15 ते 20 हजार रुपये परस्पर घेतले जात आहेत. या प्रकरणात घरकुल निरीक्षक, ग्रामसेवक व पंचायत समितीचे काही वरिष्ठ अधिकारी सहभागी असल्याची खात्रीशीर माहिती आहे.
6. ज्या लाभार्थ्यांनी मागील वर्षी घरकूल बांधले आहे, अशा व्यक्तीनी पुन्हा वाळूची मागणी केली आहे. प्रत्यक्षात त्यांना वाळूची गरज नसून ती वाळू प्रत्येक तालुक्यातील त्या त्या परिसरात जास्त किमतीने विकण्याच्या उद्देशाने घेतली जात आहे.
7. मंठा तालुक्यातील दहागाव येथे
असलेल्या गावातील अंगणवाडी क्र. १ येथील अंगणवाडीची इमारत जीर्ण झालेली असून तेथील अंगणवाडीच्या इमारतीसाठी निधी उपलब्ध .असतांना देखील ग्रामसेवक व सरपंच यांनी अंगणवाडी इमारतीचे काम जाणीवपूर्वक केलेले नाही.
8. जालना जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील सिंचनातील विविध योजनेतील विहिरीच्या मंजुरीसाठी एकेक शेतकऱ्यांकडून प्रत्येकी 40 हजार ते 50 हजार रुपये एवढी लाच घेतली जात आहे.
9. जालना जिल्ह्यातील सर्व तालुका कृषी कार्यालयाद्वारे दिल्या जाणाऱ्या सर्व योजनांचा लाभ संबंधित अधिकाऱ्याच्या नातेवाईक आणि ओळखीच्या व्यक्तींनाच देण्यात येत असल्याचे स्पष्टपणे उघड झालेले आहे सर्वसामान्य शेतकऱ्यांना लाभ घेण्यासाठी सरळ सरळ आणि उघडपणे वेगवेगळे योजनेत वेगवेगळी लाच मागितली जात आहे.
10. जालना जिल्ह्यातील प्रत्येक ग्राम पंचायतीत वित्त आयोगाअंतर्गत येणाऱ्या निधीचा वापर करताना प्रत्यक्ष काम आणि पाहणी न करता परस्पर बिले काढण्यात येत आहेत ही देखील गंभीर बाब निदर्शनास आलेली आहे.
11. आरटीआय अंतर्गत खासगी शाळेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून शालेय साहित्याच्या नावावर बळजबरीने फी वसूल केली जात असल्याचा देखील सबळ पुरावा उपलब्ध आहे वरील सर्व प्रकार हे अत्यंत गंभीर स्वरूपाचे असून शासनाच्या योजना व सामान्य जनतेच्या हक्काची पद्धतशीरपणे पिळवणूक करणारे आहेत या सर्व प्रकरणाची तातडीने सखोल चौकशी करून दोषी कर्मचाऱ्यांविरुद्ध आवश्यक ती प्रशासकीय व कायदेशीर कठोर कारवाई करण्यात यावी जेणेकरून सामान्य जनतेला न्याय मिळेल व शासनाच्या योजनांचा लाभ थेट गरजूंना मिळेल असे निवेदनात म्हटले आहे या निवेदनावर माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समितीचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष राजू शिंदे, जालना जिल्हा अध्यक्ष अशोक म्हस्के, जालना जिल्हा सचिव जगन्नाथ घोडे, जालना जिल्हा कार्याध्यक्ष गिरिजात्मज सारणीकर, टेंभुर्णी उपविभागीय अध्यक्ष अनिल ससाने, जालना जिल्हा संघटक मनोज परदेशी, जाफराबाद तालुका सदस्य गजानन फलफले, जाफराबाद तालुका उपाध्यक्ष राम ससाने,जाफराबाद तालुका महिला अध्यक्ष गोदावरी लेंभे,मंठा तालुका उपाध्यक्ष काशिनाथ मंदे, दे. तालुका उपाध्यक्ष कारभारी गायकवाड, जालना तालुका कोंडीबा अनपट , लोणार तालुका उपाध्यक्ष आरिफ शेख यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## सण उत्सवांची परवानगी आपले सरकार पोर्टल द्वारे ऑनलाईन पद्धतीने घ्या- पी.एस.आय. सूरज पाटील

### शांतता कमिटी सभेत केले आवाहन

**दैनिक युवक आधार**
**नागोठणे वार्ताहर**

पोलिस ठाण्यात आगामी येणारे आषाढी एकादशी व मोहरम सणाच्या अनुषंगाने बुधवार 02 जुलै रोजी पोलिस ठाणे हद्दीतील शांतता कमिटी सदस्य, प्रतिष्ठित नागरिक, पत्रकार,मोहल्ला समिती सदस्य, पोलीस पाटील यांची आयोजित केलेल्या बैठकीत पी.एस.आय. सूरज पाटील यांनी सण,उत्सवांची परवानगी आपले सरकार पोर्टल द्वारे ऑनलाईन पद्धतीने घेण्याचे आवाहन केले. यावेळी उपसरपंच अकलाक पानसरे,पोलिस पाटील - वैजयंती गदमले,वनिता म्हात्रे व मनीषा पाटील,गुन्हा शाखेचे स्वप्नील भालेकर,पोलिस कॉन्स्टेबल बाली पुटेवाड यांच्यासह शांतता कमिटी सदस्य व नागरीक उपस्थित होते. उपस्थितांना मार्गदर्शन करताना सूरज पाटील यांनी सांगितले की, थोड्याच दिवसात आषाढी एकादशी व मोहरम सण



येत आहेत. त्या व इतर कार्यक्रमासाठी पोलीस ठाणे पातळीवर देण्यात येणाऱ्या स्पीकर परवाना देणे, मनोरंजन कार्यक्रमाचा ना हरकत परवाना देणे, शोभा संमेलन मिरवणूक इत्यादी सुविधा या महाराष्ट्र शासनाच्या आपले सरकार पोर्टल द्वारे ऑनलाइन पद्धतीने अर्ज करून देण्यात येतील. त्यामुळे सर्व परवानगी ऑनलाइन पद्धतीने घेण्याचे आवाहन सर्वांना करीत आहे. मोहरम सणानिमित्त नमाज पटनचे वेळेचे योग्य ते नियोजन करून गर्दी होणार नाही याची खबरदारी घ्यावी. तसेच आषाढी वारी करता जाणाऱ्या सर्व भाविकांसाठी महाराष्ट्र शासनाने टोल माफीसाठी पथकर सवलत पासची सुविधा देण्यात आले असून गरज असणाऱ्या भाविकांनी ते पासेस पोलीस ठाणे येथून घेऊन जाणे. सर्वांनी वाहतूक नियमांचे पालन करावे, रस्त्यामध्ये अथवा गर्दीच्या ठिकाणी वाहन उभी करू नयेत.सोशल मीडियाचा वापर जपून करा. जेणे करून वाद विवाद होतील असे मेसेज टाकू नका असे सांगून सर्व सण,उत्सवांची परवानगी आपले सरकार पोर्टल द्वारे ऑनलाईन पद्धतीने घेण्याचे आवाहन शेवटी सूरज पाटील यांनी केले.कार्यक्रमाची प्रस्तावना व उपस्थितांचे आभार स्वप्नील भालेकर यांनी मानले.

## रिटघर शाळेच्या स्वच्छालय व इंटरअॅक्टिव्ह पॅनल चे उद्घाटन रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते





**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

ग्रुप ग्रामपंचायत दूंदरे च्या वतीने थेट सरपंच सुभाष शेठ भोपी यांच्या नेतृत्वाखाली भैरवदेव विद्यालय व रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय ला अत्याधुनिक सुसज्ज स्वच्छालय बांधून देण्यात आले तसेच मा.श्री.रामशेठ ठाकूर यांनी लाख रुपये किमतीचे १० वर्गांना इंटरअक्टिव्ह पॅनल देण्यात आले त्याचे आज त्याचे उद्घाटन आज २ जुलै रोजी माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी उपस्थित माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा सत्कार ग्रुप ग्रामपंचायत दूंदरे च्या वतीने व सरपंच सुभाष भोपी व कमिटी कडून करण्यात आला तसेच यावेळी सरपंच सुभाष भोपी रयत शिक्षण संस्थेचे विभागीय अधिकारी केंगेरे सर उपसरपंच शितल भोपी, रमेशशेठ पाटील आदींचा सत्कार करण्यात आला यावेळी विद्यार्थ्यांना गणवेश व रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाकडून वह्या वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले यावेळी उपस्थित मान्यवर ग्रुप ग्रामपंचायत थेट सरपंच सुभाष शेठ भोपी, माजी सरपंच भारत भोपी, विलास भोपी, राजेश भोपी, गोपीनाथ शेठ भोपी ,दीपक पाटील,कीसन पाटील,बलीराम भोपी,विष्णु भगत,वंदना भोपी, ग्रामपंचायत सदस्य विश्वास पाटील ,शांताराम चौधरी,जयदास चौधरी ,प्रलय भोपी,कमला वाघमारे,ललीता चौधरी,राणी सिनारे,ग्रामसेवक खेडकर साहेब प्राचार्य कारंडे सर आदी मान्यवर उपस्थित होते

## राज्यातील शाळांची दुरुस्ती व देखभालीसाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत सरकारची कार्यवाही सुरू - शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

राज्यातील शासकीय, जिल्हा परिषद शाळांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी तारांकित प्रश्नाद्वारे करत या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष केंद्रित केले. राज्यातील विशेषतः सिंधुदुर्ग, बीड, हिंगोली, अलिबाग (जि.रायगड), नागपूर, नाशिक, अमरावती, परभणी व अनेक जिल्ह्यांतील शासकीय व जिल्हा परिषद शाळांपैकी अनेक शाळा मोडकळीस आल्याचे, वर्गखोल्या पडण्याचे, छताला गळती लागण्याच्या व संरक्षक भिंती जमीनदोस्त झाल्याची घटना मे २०२५ मध्ये निदर्शनास आली असून अद्यापही उक्त जिल्ह्यांमध्ये निधी उपलब्ध न झाल्यामुळे पायाभूत सुविधांची कामे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, शाळांच्या जीर्ण अवस्थेमुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण धोक्यात असल्याचे विविध जिल्ह्यांतील पाहणीत व स्थानिक लोकप्रतिनिधींच्या लेखी तक्रारींमध्ये नमूद करण्यात आले आहे, त्यामुळे चौकशीच्या अनुषंगाने शाळांच्या देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असा तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर यांनी मुंबई येथे सुरु असलेल्या पावसाळी अधिवेशनात दाखल केला होता. शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी दिलेल्या लेखी उत्तरात सांगितले कि, शासकीय/ जिल्हा परिषदेच्या शाळांच्या व वर्गखोल्यांच्या मोठ्या व किरकोळ दुरूस्तीबाबत प्रस्ताव प्राप्त आहेत. त्या अनुषंगाने पायाभूत सुविधांची कामे आणि लोकप्रतिनिधींच्या लेखी तक्रारीच्या नुसार शाळांच्या दुरुस्ती कामांना जिल्हा वार्षिक योजना, समग्र शिक्षा अभियान व अन्य योजनांच्या माध्यमातुन निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

## राळेगाव तालुक्यातील वनोजा येथून पंढरपूरच्या जयघोषासाठी लालपरी बस रवाना

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:**
**-जितेंद्र खोडे**

**राळेगावः-** दरवर्षीप्रमाणे यंदाही राळेगाव बस आगारातून आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरसाठी तालुक्यातील राळेगाव आगारातून दि.१ जुलै रोजी दुपारी १ वाजता वनोजा येथून ४५ विठ्ठलभक्त घेत पंढरपूर करिता राळेगाव आगाराची लालपरी रवाना झाली वनोजा ते पंढरपूर पूर्ण तिकीट ११५७ रु.असून महीलासाठी ५७९ रु.अर्ध तिकीट ठेवण्यात आले आहे,वनोजा येथून पंढरपुर ५७० किलोमीटर अंतरावर आहे. वास्तविक पाहता खरिपाची पेरणी आटोपल्यानंतर शहरासह ग्रामीण भागातील अनेक भाविक आषाढी एकादशीनिमित्त विठू माऊलीच्या दर्शनासाठी जात असतात.पेरणी करून पावसाची तमा न बाळगता ग्रामीण भागातील नागरिकांनी विठूरायाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी पंढरीला जाण्याची तयार केली आहे.राळेगाव तालुक्यातील वारकऱ्यांनी देखील भरभरुन प्रतिसाद दिला आहे. त्यामुळे एसटी महामंडळाच्या उत्पन्नात भर पडणार आहे.यावेळी वनोजा गावातील विठ्ठलभक्त भास्कर काचोळे,देवराव गुडधे,शालिक दांडेकर, दादाजी काटेकर,रमेश चिंचोणे यांच्यासह अनेक भाविक भक्तांसह उत्साहाच्या वातावरणात लालपरी बस पंढरपूरसाठी रवाना झाली.




## पनवेल वकील संघटनेच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञांचे व्याख्यान संपन्न

**दैनिक युवक आधार**
**पनवेल ( वार्ताहर ) :**

पनवेल वकील संघटनेच्या वतीने अध्यक्ष अड. मनोज भुजबळ यांच्या संकल्पनेतून विधी व्याख्यानमाला २०२४-२५ या उपक्रमा अंतर्गत वकील वर्गाला अत्यंत उपयुक्त असे मार्गदर्शन करणारे ज्येष्ठ विधिज्ञांचे व्याख्यान दरमहा आयोजित करण्यात येते. सदर व्याख्यानमाले अंतर्गत आठवे व्याख्यान बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवाचे विद्यमान सदस्य व माजी उपाध्यक्ष जेष्ठ विधीज्ञ अड. अहमद खान पठाण (संस्थापक एस. पी. लॉ क्लासेस, पुणे) यांचे मुस्लिम कायदा- लग्न, घटस्फोट आणि मुस्लिम व हिंदू वारसा हक्क यांचा तुलनात्मक अभ्यास या विषयावर श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ सभागृह, मार्केट यार्ड, पनवेल येथे आयोजित करण्यात आले होते.सदर व्याख्यानामध्ये ज्येष्ठ विधीज्ञ अहमद खान पठाण यांनी उपस्थित वकील वर्गाला सदर विषयास अनुसरून मोलाचे मार्गदर्शन केले.सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अड. प्रशांत भुजबळ यांनी तर प्रस्तावना अड. दिपाली बोरा यांनी केले व आभार प्रदर्शन पनवेल वकील संघटनेचे सचिव व ज्येष्ठ विधीज्ञ श्री. प्रल्हाद खोपकर यांनी केले. सदरवेळी व्यासपीठावर पनवेल वकील संघटनेचे सचिव अड. प्रल्हाद खोपकर, अधिवक्ता परिषद रायगड जिल्हा महामंत्री अड. सुनील तेलगे, पनवेल वकील संघटनेचे माजी उपाध्यक्ष अड. जे. डी. पाटील, पनवेल वकील संघटनेचे सदस्य अड. भूषण म्हात्रे यांच्यासह अड. संजय पाटकर, अड. लीना पाटील, अड. परवेज खान आदी ज्येष्ठ विधिज्ञ उपस्थित होते.त्याशिवाय सदर कार्यक्रमास ज्येष्ठ विधीज्ञ अड. संतोष लाड, अड. विरेंद्र कुलकर्णी, अड. अमित चव्हाण यांच्यासह सुमारे २०० वकील उपस्थित होते.मल्हार न्यूज या चॅनेलने सदर व्याख्यानाचे थेट प्रक्षेपण केल्यामुळे संपूर्ण वकील वर्गास या व्याख्यानाचा सुलभपणे लाभ घेता आला. सदर कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल वकिलांनी पनवेल वकील संघटनेचे आभार मानले.




## राष्ट्रीय कर्मचारी सेना प्रणित शिवशंभू माथाडी व जनरल कामगार युनियनची सर्वसाधारण सभा संपन्न

### युनियनचे अध्यक्ष सुनील पाटील,सरचिटणीस दीपक भालेराव यांच्या हस्ते नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रे प्रदान

**दैनिक युवक आधार**
**मुंबई (शांताराम गुडेकर)**

राष्ट्रीय कर्मचारी सेनेचे मुख्य मार्गदर्शक महाराष्ट्राचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री मान. श्री. एकनाथ शिंदे साहेब आणि राष्ट्रीय कर्मचारी सेनेचे अध्यक्ष तथा शिवसेना सचिव प्रवक्ते,मा. आमदार श्री.किरण पावसकर साहेब यांच्या मार्गदर्शनानुसार राष्ट्रीय कर्मचारी सेना प्रणित शिवशंभू माथाडी व जनरल कामगार युनियनची सर्वसाधारण सभा गुरुवारी स्वर्गीय आनंद करू पाटील सभागृह शिंपोली येथे संपन्न झाली. या सभेत नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना शिव शंभू माथाडी कामगार आणि जनरल कामगार युनियनचे अध्यक्ष श्री. सुनील पाटील आणि सरचिटणीस श्री.दीपक भालेराव यांच्या हस्ते नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली.या कार्यक्रमाला शिवशंभू माथाडी आणि जनरल कामगार युनियनचे अध्यक्ष श्री. सुनील पाटील,सरचिटणीस श्री. दीपक भालेकर व महिला विधानसभा समन्वय सौ.वंदना नार्वेकर उपस्थित होत्या.शेवटी शाखाप्रमुख श्री.नवनाथ बच्चे यांनी सर्वांचे आभार मानले व सभेची सांगता केली.



सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करून मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# दारव्हा पोलीस ठाण्यात शिवसेना महिला आघाडीची धडक .

**अयोध्या पौळ प्रकरण**
**दैनिक युवक आधार**
**दारव्हा तालुका वार्ताहर**
दारव्हा-मृद व जलसंधारण मंत्री तथा यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांच्या बद्दल एका महिलेने ऑडिओ क्लिप व्हायरल केल्याने शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या भावना दुखावल्या ;त्यामुळे संबंधित महिलेवर तात्काळ गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करून कारवाई करण्यात यावी या मागणीसाठीआज शिवसेना महिला आघाडीच्या वतीने दारव्हा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या कार्यकर्ते अयोध्या पोळ यांनी एका कार्यकर्त्यांसोबत फोनवर बोलताना मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांच्या विरोधात एक ऑडिओ क्लिप केली आहे . या व्हायरल क्लिप मुळे मंत्री राठोड यांचा अपमान होत आहे. त्यामुळे संबंधित महिलेच्या अशा वक्तव्यामुळे शिवसैनिकांच्या भावना दुखावल्या असून कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही . हा प्रकार थांबविण्याकरिता अयोध्या पोळ यांच्यावर गंभीर स्वरूपाची गुन्हे दाखल करून कारवाई करण्यात यावी अशी मागणी यावेळी दारव्हा पोलीस स्टेशनच्या पोलिस निरीक्षकाकडे निवेदनातून केली आहे . यावेळी महिलाआघाडी तालुकाप्रमुख पुष्पा ससाने, महिला आघाडी शहर प्रमुख आशाताई डोंगरे, सुरेखा राठोड, मंगला निंबेकर,रुजाता राऊत ,चंद्रदिपा चव्हाण , शितल राठोड, शोभाताई राठोड , अश्विनी कुरसिंगे,जया लाभसेटवार ,वैशाली खाटीक , जयश्री दुधे, दीपा सिंगी , शांता जाधव, पुष्पा बेलपत्रे, मीराबाई टेकाम, जिल्हाप्रमुख यशवंत पवार ,तालुका प्रमुख मनोज सिंगी, शहर प्रमुख राजू दुधे ,गणेश दुबे, विनोद वांडरस्वार, प्रकाश दुधे, मुकुंद चिरडे, रोहिदास पवार, दीपक जाधव, विवेक जाधव, योगेश गवळी, विनोद आडे,धिरज मनवर,व इतर शिवसैनिक उपस्थित होते.




## खैर प्रजातीच्या रोपांचे पालकमंत्री डा उदय सामंत यांच्या हस्ते

### शेतकऱ्यांना शनिवारी चिपळूण येथे मोफत वाटप

**दैनिक युवक आधार**
**रत्नागिरी, (जिमाका):-**
वनविभाग आणि सामाजिक वनीकरण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील शेतकऱ्यांना खैर प्रजातीच्या रोपांचे पालकमंत्री डॉ. उदय सामंत यांच्या हस्ते चिपळूण येथे मोफत वाटप होणार आहे. शनिवार ५ जुलै २०२५ रोजी सकाळी १० ते ११.३० वाजता चिपळूणमधील इंदिरा गांधी सांस्कृतिक सभागृहात होणाऱ्या कार्यक्रमात वन वणवा प्रतिबंधात्मक उपाययोजना कार्यक्रमही होणार असल्याची माहिती विभागीय वन अधिकारी सामाजिक वनीकरण विभाग रणजित गायकवाड आणि विभागीय वन अधिकारी (प्रा.) गिरिजा देसाई यांनी दिली.*

यावेळी गृह (शहरे), महसूल, ग्रामविकास व पंचायत राज, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, अन्न व औषध प्रशासन राज्यमंत्री योगेश कदम, खासदार नारायण राणे, खासदार सुनिल तटकरे, विधान परिषद सदस्य आमदार निरंजन डावखरे, आमदार प्रसाद लाड, आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, विधानसभा सदस्य आमदार भास्कर जाधव, आमदार शेखर निकम, आमदार किरण सामंत यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

कार्यक्रमाला जिल्हाधिकारी एम. देवेंदर सिंह, पोलीस अधीक्षक नितीन बगाटे, मुख्य कार्यकारी अधिकारी वैदेही रानडे हे अतिथी उपस्थित राहणार आहेत.

## मदन खानझोडे मास्टर ऑफ सायन्स परीक्षा उत्तीर्णः

**दैनिक युवक आधार**
**- रिसोड प्रतिनिधी.**
**रणजीत सिंह ठाकुर**
कंकरवाडी येथील संत तुकाराम महाराज विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे गणित शिक्षक मदन किसनराव खानझोडे यांनी नुकतीच यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठमार्फत मास्टर ऑफ सायन्स गणित परीक्षा ग्रेड ए प्लस मध्ये उत्तीर्ण केली आहे. त्यांनी मिळवलेल्या घवघवीत येशाबद्दल शाळेचे संस्थापक अध्यक्ष श्रीकृष्ण ढेकळेसर व शाळेचे प्राचार्य साहेबराव जाधव तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. त्यांच्या या वाढीव शैक्षणिक पात्रतेचा फायदा निश्चितच विद्यालयातील विद्यार्थ्यांना होणार आहे.




## शाळाबाह्य विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचा शासनाचा प्रयत्न ..शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे

**दैनिक युवक आधार**
**मुंबई.. संतोष पाटील**
राज्यात शाळाबाह्य विद्यार्थ्यांना पुन्हा मुख्य प्रवाहात आणण्यासाठी १ ते १५ जुलै दरम्यान विशेष मोहिम राबवली जात आहे. आधार लिंकिंग आणि अपार आयडी (विद्यार्थ्यांसाठी युनिक कोड) यामार्फत प्रत्येक विद्यार्थ्याचा शिक्षण प्रवास ट्रॅक केला जाणार आहे.अनेक विद्यार्थी दहावी नंतर आयटीआय, डिप्लोमा आदी अभ्यासक्रमांकडे वळतात. मात्र, त्यांच्या शाळेतील रेकॉर्ड अद्ययावत होत नसल्यामुळे ते 'ड्रॉपआउट' म्हणून नोंदविले जातात. सध्या राज्यात ८६% विद्यार्थ्यांचा डेटा संकलित झालेला असून ९५% आधार लिंकिंग पूर्ण झाले असल्याचेही मंत्री भुसे यांनी सांगितले.शासन विद्यार्थ्यांची घटती पटसंख्या, शाळाबाह्य विद्यार्थी आणि शिक्षणाच्या गुणवत्तेसंदर्भात गंभीर असून सर्वंकष उपाययोजना राबवत आहे. यु-डायस (UDISE) प्रणालीच्या आकडेवारीनुसार विद्यार्थ्यांची संख्या काहीशी घसरलेली असली तरी त्यामागील कारणे समजून घेऊन योग्य ती कार्यवाही केली जात आहे, असे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी विधानपरिषदेत सांगितले. नियम 92 अन्वये अर्धातास चर्चेला उत्तर देतं मंत्री भुसे बोलत होते.मंत्री दादा भुसे म्हणाले की,शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षण, विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके, गणवेश, पोषण आहार, स्वच्छ शाळा, शुद्ध पिण्याचे पाणी, शौचालये, आणि खेळांची सुविधा यासाठी विशेष भर दिला जात आहे. आतापर्यंत 9 हजार उच्चशिक्षित शिक्षक नियुक्त झाले असून आणखी १० हजार भरती प्रक्रियेत आहेत.मंत्री भुसे यांनी स्पष्ट केले की, कोणतीही शाळा बंद होणार नाही आणि प्रत्येक विद्यार्थ्याला गुणवत्ता पूर्ण व आनंददायी शिक्षण मिळावे, हे शासनाचे उद्दिष्ट आहे. या कामात सर्व जनतेने आणि लोकप्रतिनिधींनी सहकार्य करावे, असेही आवाहन त्यांनी केले.

## चंदूकाका सराफ प्रायव्हेट लिमिटेड तर्फे डॉ नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशन विशेष शाळेला कपाट भेट

दैनिक युवक आधार
पनवेल प्रतिनिधी
दिनांक 03 /07 /2025 रोजी चंदूकाका सराफ प्रायव्हेट लिमिटेड च्या संचालिका सन्माननीय सौ .नेहा किशोर कुमार शहा मॅडम ,कु. सम्यक किशोर कुमार शहा सर( मॅनेजिंग डायरेक्टर चंदूकाका सराफ प्रायव्हेट लिमिटेड) श्री. सुमित देवडा सर( हेड ऑफ द डिपार्टमेंट मार्केटिंग अँड अडव्हर्टायझिंग डिपार्टमेंट), श्री. कुमार राठोड सर (मार्केटिंग मॅनेजर चंदूकाका सराफ प्रायव्हेट लिमिटेड ),मा. श्री. गजानन जी. एस.बारगजे सर (क्लस्टर मॅनेजर चंदूकाका सराफ प्रायव्हेट लिमिटेड )यांनी,डॉ नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशन बौद्धिक अक्षम मुलांची विशेष शाळा नविन पनवेल यांना कपाट भेट म्हणून देण्यात आली.शुक्रवार दिनांक 4 जुलै 2025 रोजी चंदुकाका सराफ पेढीचा पनवेल येथे भव्य शुभारंभ होणार आहे. या निमित्ताने त्यांनी शाळेत भेट दिली होती .डॉ नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशन संस्थेचे सचिव श्री .सुरेश जाधव सर, खजिनदार श्री. अतुल वाणी सर व शाळेच्या मुख्याध्यापिकास सौ. श्रेया जाधव मॅडम यांनी पुष्पगुच्छ व मुलांनी केलेल्या गिफ्ट बॅग देऊन स्वागत केले.शाळेचे व्यावसायिक सामान ठेवण्यासाठी कपाटे व विद्यार्थ्यांना स्कूल बॅग चंदुकाका सराफ प्रायव्हेट लिमिटेड यांच्यातर्फे भेट म्हणून देण्यात आल्या

चंदूकाका सराफ प्रायव्हेट लिमिटेड च्या संचालिका सन्माननीय सौ .नेहा किशोर कुमार शहा मॅडम यांनी शाळेत चालणाऱ्या कामाचे खूप कौतुक केले आणि यापुढेही अशीच मदत करू असे आश्वासन दिले. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.श्रेया जाधव यांनी उपस्थितांचे आभार मानल्यानंतर कार्यक्रम संपन्न झाला.





## दादासाहेब फाळके पुरस्कार 2025 कलावंत अभिनेता दिग्दर्शक प्रमोद पंडीत यांना सन्मानित

**दैनिक युवक आधार**
**प्रतीनीधी ( शिर्डी )**
कलावंत विचार मंच, कमल फिल्म प्रॉडक्शन व कमल म्युझिक मराठी संयुक्त विद्यमाने वर्ष ११ वे चित्रपट मर्हर्षी दादासाहेब फाळके यांच्या जयंती- स्मुतीदिन शिर्डीत येथे पाथरे बु ता राहाता राहणारे अभिनेता दिग्दर्शक प्रमोद पंडीत, दादासाहेब फाळके पुरस्कार कलावंत सन्मानित करताना देवमाणुस सिरीयल मधली सिने अभिनेत्री पुष्पा चौधरी यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आले त्यावेळी प्रमुख अतीथी म्हणुन माझी शिर्डी नगरध्यक्षा जयश्रीताई थोरत, माझी कुषी आधिकारी गंगाधर कदम, साहित्यिक सुभाष सोनवणे किरण एस गोंदकर (हॉटेल साई एस के पॅलेस) व कलाकार उपस्थित होते हॉटेल साई एस के पॅलेस शिर्डी येथे दिनांक २२ जुन २०२५ रोजी सन्मान कलावंतांचा पुरस्काराने २२ कलावंत सन्मानित करण्यात आले.पुरस्कार वितरण सोहळ्याचे प्रस्तावना व पाहुण्याचे स्वागत सुनील मोंढे यांनी केले तसेच सुत्रसंचालन श्रीकुष्ण वैजयंती सिन्नरकर यांनी करुन आभार कर्मयोगी आबासाहेब सिनेमाचे लेखक दिग्दर्शक अल्ताफ शेख यांनी मानले. ज्ञानेश्वर शिंदे पाटील,जयश्री कोरे महेश नानासाहेब रेवगडे (सामाजिक सेवा), अभिनेता महेश लोखंडे,दुर्गा बावके, शंकर सोनवणे ,ज्ञानेश्वर साबळे, निलम शिंदे, माळवे मॅडम ,सतीश कदम आदींनी परीश्रम घेतले.



## आदर्श शिक्षक बापू शिंदे यांची दिल्ली येथे बी.एल.ओ. प्रशिक्षणासाठी निवड

**दैनिक युवक आधार**
**आष्टी.दि.3 (प्रतिनिधी)** :- पी.एम.श्री.जि.प.मा.शा. आष्टा ह.ना. ता. आष्टी,जी.बीड येथील आदर्श शिक्षक,स्काऊट मास्टर, तथा मतदान केंद्रस्तरिय अधिकारी ( बी.एल. ओ. ) बापू बाबा शिंदे यांची २३१आष्टी विधानसभा मतदार संघाअंतर्गत बी.एल.ओचे प्रतिनिधित्व करण्यासाठी नवी दिल्ली ( आय.आय.आय.डी.ई.एम.) येथे ०३/०७/२०२५ते ०४/०७/२०२५ या दोन दिवसाच्या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. याकरिता त्यांची बुध लेव्हल ऑफिसर प्रशिक्षणासाठी निवड करण्यात आली आहे. बापू शिंदे यांची दिल्ली येथे प्रशिक्षणासाठी निवड झाल्याबद्दल त्यांचे आष्टी मतदार संघाचे लोकप्रिय आमदार सुरेश (आण्णा ) धस साहेब, जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी मनोरंजन धस साहेब,निवडणूक विभाग प्रमछि तथा आष्टीच्या तालुका दंडाधिकारी यथा तहसिलदार वैशाली पाटील मॅंडम , निवासी नायब तहसिलदार प्रकाश शिरेसवाड , महसुल सहाय्यक अधिकारी मा.शिवप्रसाद गारोळे,ऑपरेटर विशाल मोकाशे,आष्टा गटाचे मा.जि.प.सदस्य अमरराजे निंबाळकर, सरपंच गणेश माळवे, उपसरपंच वैभव पठाडे,शाळख व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संजय पठाडे, आष्टा.ह.ना.शाळेचे मुख्याध्यापक रघुनाथ मुटकुळे,केंद्रप्रमुख धर्मनाथ शिंदे,पतसंस्थेचे चेअरमन मारुती पठाडे,उपाध्यक्ष अशोक लटपटे, पतसंस्थेचे सचिव महेशकुमार शिंदे,शिक्षक संघटनेचे अध्यक्ष संदिप खराडे, मच्छिंद्रनाथ जगताप सर ,बाळासाहेब शेंदूरकर,अशोक पठाडे,प्रविण गांगुर्डे ,मिलिंद नेटके,व आष्टा शाळेच्या सर्व शिक्षक स्टाफने बापू शिंदे यांचे अभिनंदन केले.



# रिपब्लिकन पक्षाच्या वतीने आज दि .4 जुलै रोजी मुंबईत

### गेटवे ऑफ इंडिया जवळ कॅन्डल मार्च

## केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले नेतृत्व करणार

**दैनिक युवक आधार**
**पनवेलः (आनंद पवार)**
अहमदाबाद मध्ये एयर इंडियाच्या जंबो जेट विमान अपघातात २४० लोक मृत्युमुखी पडले. या अत्यंत भीषण अपघातात मृत्यू पावलेल्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी रिपब्लिकन पक्षाच्या वतीने केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांच्या नेतृत्वात शुक्रवार दि.४ जुलै रोजी सायंकाळी ६वाजता मुंबईत रेडिओ क्लब ते गेट वे ऑफ इंडिया असा कॅन्डल मार्ग काढण्यात येणार आहे. या कॅन्डल मार्च मध्ये बॉलिवूड चे अनेक सेलिब्रिटी कलाकार उपस्थित राहणार आहेत. त्यासाठी अभिनेत्री संगीता कापूरे आणि अभिनेते गौरव शर्मा हे प्रयत्नशील आहेत.या कॅन्डल मार्च मध्ये मुंबईतील रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन रिपब्लिकन पक्षाचे मुंबई प्रदेश अध्यक्ष सिद्धार्थ कासारे यांनीही केले आहे.रिपब्लिकन पक्षातर्फे आयोजित या कॅन्डल मार्च च्या नियोजनाची बैठक बांद्रा येथे आज घेण्यात आली. त्यात रिपब्लिकन पक्षाचे मुंबई अध्यक्ष सिद्धार्थ कासारे,मुंबई प्रदेश कार्याध्यक्ष बाळासाहेब गरुड मुंबई प्रदेश सरचिटणीस विवेक पवार, खजिनदार सुनील मोरे जिल्हा अध्यक्ष संजय डोळसे,जिल्हा अध्यक्ष रमेश गायकवाड;प्रकाश जाधव संजय पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

रिपब्लिकन पक्षाने आयोजित केलेल्या कॅन्डल मार्चा ला शुक्रवार दि ४जुलै रोजी सायंकाळी ६ वाजता मुंबईत रेडिओ एन क्लब येथून सुरुवात होणार असून.गेट वे ऑफ इंडिया येथे समारोप करण्यात येणार आहे.या कॅन्डल मार्च मध्ये अहमदाबाद विमान दुर्घटनेतील मृतांना रिपब्लिकन पक्षातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात येणार आहे.या कॅन्डल मार्च चे नेतृत्व रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले करणार आहेत.यावेळी रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस अविनाश महातेकर,राज्य सरचिटणीस गौतम सोनवणे अभिनेत्री संगीता कपूरे गौरव शर्मा सिद्धार्थ कासारे सर्व रिपब्लिकन जिल्हा अध्यक्ष तालुका अध्यक्ष उपस्थित राहणार आहेत अशी माहिती रिपाइं तर्फे देण्यात आली आहे.

## परवानाधारक व्यापाऱ्यांनाच बांधावर जाऊन शेतमाल खरेदीची परवानगी - पणन मंत्री जयकुमार रावल

**दैनिक युवक आधार**
**मुंबई.संतोष पाटील** : बांधावर जाऊन शेतमाल खरेदी करणे अडचणीचे होत आहे. यामधून शेतकऱ्यांची फसवणूक झाल्याचे प्रकार राज्यात निदर्शनास येत आहेत. त्यामुळे यापुढे बांधावर जाऊन शेतमाल खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यांना संबंधित कृषी उत्पन्न बाजार समितीचा परवाना बंधनकारक करण्यात येणार आहे. परवाना असलेल्या व्यापाऱ्यांनाच संबंधित कृषी उत्पन्न बाजार समितीच्या क्षेत्रात बांधावर जाऊन शेतमाल खरेदीची परवानगी देण्यात येईल, असे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले. याबाबत सदस्य दौलत दरोडा यांनी प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाच्या उत्तरात अधिक माहिती देताना मंत्री श्री. रावल म्हणाले, अकोला जिल्ह्यातील अंदुरा अग्रो प्रोडूसर कंपनीने (ता. बाळापूर) शेतकऱ्यांचा सोयाबीन शेतमाल खरेदी केला. खरेदी केलेला शेतमाल वखार महामंडळाच्या गोदामात ठेवण्यात आला. वखार महामंडळाच्या गोदामातील पावत्या आणि खरेदी केलेल्या शेतमालामध्ये १,२९७ क्विंटलची तफावत आढळून आली आहे. याबाबत कंपनीचे मालक व अन्य ११ लोकांवरती गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या तफावतीचे पैसे शेतकऱ्यांना देण्यासाठी कंपनीचा बाजार समितीकडून देय असलेला ३६ लाख रुपयांचा निधी अडकविण्यात आला आहे. शेतकऱ्यांचे पैसे तातडीने देण्यासाठी वसुलीची कार्यवाही करण्यात येत आहे. शेतीशी संबंधित शेतकऱ्यांचे फसवणुकीचे गुन्हे कमी करण्यासाठी 'कृषी गुन्हे शाखा' आणि कृषी न्यायालय स्थापन करण्याबाबत शासन सकारात्मक आहे. यावर्षीच्या हंगामासाठी सोयाबीन खरेदी केंद्र वाढविण्याबाबत शासन सकारात्मक आहे. मागील वर्षात राज्यामध्ये देशातील सर्वाधिक ११ लाख २१ हजार क्विंटल सोयाबीन खरेदीचा उच्चांक करण्यात आला. या वर्षी सुद्धा हाच प्रयत्न राहणार आहे असेही पणन मंत्री श्री. रावल यांनी सांगितले. प्रश्नाच्या चर्चेमध्ये सदस्य भास्कर जाधव, नाना पटोले, कैलास पाटील, सुधीर मुनगंटीवार, रोहित पवार, रणधीर सावरकर, असलम शेख, श्रीमती सुलभा खोडके यांनीही सहभाग घेतला.

## विधान भवनात सार्वजनिक बांधकाम मंत्री मा. छत्रपती श्री. शिवेंद्रराजे भोसले यांची भेट घेऊन नांदेड जिल्ह्यातील विविध विकासकामांना अधिवेशनात प्रशासकीय मंजुरी मिळावी यासंदर्भात निवेदन सादर करण्यात आले



**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**
**नांदेड** - खासदार डॉ अजित गोपछेडे, नांदेड जिल्ह्यातील देगलूर तालुका हा महाराष्ट्र आणि तेलंगणाच्या सीमेवर वसलेला आहे. या भागात काळी माती अधिक प्रमाणात असल्यामुळे पावसाळ्यात रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था होते. त्यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणावर गैरसोयींचा सामना करावा लागतो यातील अनेक रस्ते हे मुख्य रस्त्यांना जोडणारे असल्यामुळे त्यांचे दुरुस्ती व डांबरीकरण करणे तातडीचे व अत्यावश्यक आहे.

नांदेड जिल्ह्यातील देगलूर तालूक्यातील देगलूर-करडखेड-मरखेल-हणेगाव ते कर्नाटक राज्यसीमा प्रजिमा - 07 रस्त्याची लहान पुल व नळकांडी पुलांची बांधकामासह सुधारणा करणे नांदेड जिल्ह्यातील देगलूर तालूक्यातील देगलूर-करडखेड-मरखेल-हणेगाव ते कर्नाटक राज्यसीमा प्रजिमा - 07 रस्त्यातील लहान पुल व नळकांडी पुलांची बांधकामासह सुधारणा करणे तरी सदर कामांसाठी अधिवेशनात प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी, जेणेकरून रस्ते दुरुस्तीस गती मिळेल आणि स्थानिक नागरिकांना सुरक्षित व सुलभ प्रवासाची सुविधा मिळेल, अशी विनंती मा. मंत्रिमहोदयांकडे करण्यात आली आहे

## गुरुमाऊली चंद्रभागा फाउंडेशन(रजि.) तर्फे निळकंठ बगळे "सामाजिक कर्तव्यदक्ष पुरस्कार-२०२५ ने सन्मानित

**दैनिक युवक आधार**
**मुंबई (शांताराम गुडेकर)**

गुरुमाऊली चंद्रभागा फाउंडेशन(रजि.)तर्फे तालुका लांजा जिल्हा रत्नागिरी लांजा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सन्मा.श्री.निळकंठ बगळे साहेब यांना "सामाजिक कर्तव्यदक्ष पुरस्कार-२०२५ देऊन नुकतेच सन्मानित करण्यात आले.लांजा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सन्मा. श्री.निळकंठ बगळे साहेब लांजा तालुक्यामध्ये आल्यापासून खूप काही चांगले निर्णय घेऊन चांगले काम करत आहेत.लांजा तालुक्यामध्ये बाहेरून येणारे परप्रांतीय यांची सखोल चौकशी करून त्यांची विचारपूस करत आहेत.आपले कर्तव्य लक्षात घेऊन खूप काही मोलाची चांगली कामे केली. तसेच लांजा तालुकामध्ये कोणत्याही संस्थेचे व समाजाचे कार्यक्रम असले की त्यांना आमंत्रण दिल्यानंतर ते त्या आमंत्रणाचा आदर करून हजर राहतात.त्याचा लांजा मधील नागरिकांना खूप अभिमान आहे.पोलीस निरीक्षक साहेबाना सोमवार( दि.३० जून २०२५) रोजी गुरुमाऊली चंद्रभागा फाउंडेशनच्यावतीने लांजा पोलीस स्टेशनला भेट देऊन त्यांना सामाजिक कर्तव्यदक्ष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. गुरुमाऊली चंद्रभागा फाउंडेशन संस्थेचे अध्यक्ष डॉ.चंद्रकांत करंबळे,उपाध्यक्ष श्री. सुभाष रामाणे,महासचिव- अमोल मेस्त्री,खजिनदार श्री.रवींद्र कोटकर यांच्य उपस्थित लांजा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री.निळकंठ बगळे साहेब यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी रत्नागिरी शहरी विभागाचे पोलीस अधिकारी व हवालदार तसेच लांजा तालुक्याचे पोलीस अधिकारी व हवालदार. कर्मचारी वर्ग उपस्थित होते. उच्च न्यायालयाचे कर्मचारी,समाजसेवक श्री.चंद्रकांत चंद्रभागा शिवराम करंबळे हे गुरुमाऊली चंद्रभागा फाउंडेशनच्या प्रयत्नाने रत्नागिरी जिल्हा दिव्यांग समन्वय समितीला आर्थिक मदत,याशिवाय जेष्ठ नागरिक समूहाला पाणी, बिस्कीट वाटप केले जाते. गुरुमाऊली चंद्रभागा फाउंडेशनचे अध्यक्ष समाजसेवक श्री. चंद्रकांत शिवराम करंबळे आणि परिवार व पदाधिकारी, सदस्य, सभासद, हितचिंतक यांच्यातर्फे कोकणात दरवर्षी विविध उपक्रम राबविण्यात येतात.शिक्षण,समाजसेवा, ग्रामसेवा, तंटामुक्त, कृषीसेवा, शेती विकास, कामगार, उद्योग, साहित्य, कला, क्रीडा, ग्रंथपालन, पर्यावरण आदी क्षेत्रात गुरुमाऊली चंद्रभागा फाउंडेशनचे कार्य कौतुकास्पद आहे.फळाची अपेक्षा न ठेवता सतत कार्य करत रहाणे हे गुरुमाऊली चंद्रभागा फाउंडेशनचे अध्यक्ष समाजसेवक श्री.चंद्रकांत शिवराम करंबळे यांचा मूळ उद्देश आहे.गुरुमाऊली चंद्रभागा फॉउंडेशनचे सर्व पदाधिकारी, सदस्य आणि सभासद, हितचिंतक यांचा या सर्व कार्यास मोलाचा सहभाग असतो.

## शिरूर अनंतपाळ कृषिउत्पन्न बाजार समितीवर प्रशासकीय मंडळाची निवड..

### माजी जिल्हापरिषद कृषी व पशुसंवर्धन सभापती गोविंद चिलकुरे यांची मुख्य प्रशासक पदी नियुक्ती...

**दैनिक युवक आधार**
**प्रशांत तांबोळकर लातुर**



**शिरुरआनंतपाळ :** शिरूर अनंतपाळ तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीत गेल्या चार पाच वर्षांपासून निवडणुका झाल्या नसल्यामुळे बाजार समितीची देखभाल व समिती चालवण्यासाठी कोणीही नसल्यामुळे समितीचा विकास ठप्प झाल्यामुळे महाराष्ट्र शासनांच्या कृषी व पनन महासंघाच्या वतीने दि.३० जुन २०२५ रोजी ७ सदस्यी प्रशासक मंडळाची नियुक्ती करण्यात येऊन त्यामध्ये भाजपाचे जिल्हापरिषद माजी कृषी व पशुसंवर्धन सभापती गोविंद चिलकुरे यांची मुख्य प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आल्याचे प्रसिद्धी पत्रकात कळवण्यात आलेले आहे. जिल्ह्यातील शिरूर अनंतपाळ येथील कृषिउत्पन्न बाजार समितीसाठी महाराष्ट्र राज्य कृषी उत्पन्न पनन अधिनियम १९६३ मधील कलम १५ (अ) महाराष्ट्र कृषिउत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक ) नियम २०१७ चे नियम १० मधील तरतुदीनुसार पनन संचालक महाराष्ट्र राज्य पुणे विकास रसाळ यांनी कृषिउत्पन्न बाजार समिती शिरूर अनंतपाळ जि.लातूर यांचे दैनंदिन कामकाज पार पाडण्याकरिता या बाजार समितीवर नियुक्त प्रशासक यांची नियुक्ती रद्द करण्यात येऊन दि.३० जुन २०२५ पासून नव्याने ७ सदस्यांचे अशासकीय प्रशासक मंडळ नियुक्त करण्यात आलेले आहे.त्यामध्ये मुख्य प्रशासक म्हणून गोविंद त्र्यंबक चिलकुरे, कानेगाव ,प्रशासक सदस्य गोविंद नामदेव पोतदार, येरोळ, धोंडीराम भिमराव सांगवे, शिरूर अनंतपाळ, प्रकाश गोरोबा कोरे, हालकी, नवनाथ शिवराज डोंगरे, साकोळ,संभाजी निवृत्ती आयनिले, शिवपुर, बालाजी माधवराव जाधव उजेड यांची निवड झाल्याबद्दल तालुक्यातील व्यापारी, उद्योजक, व्यावसायिक, व राजकीय क्षेत्रातील लोकांकडून त्यांचे आभिनंदन होत आहे.

# भारतीय स्टेट बँक स्थापना दिनानिमित्त रिसोड शाखेत वृक्षवाटप व ग्राहक-बंधुता शपथ उपक्रम

**दैनिक युवक आधार**
**रिसोड प्रतिनिधी**
**रणजीत सिंह ठाकुर**

रिसोड (जि. वाशिम) | १ जुलै २०२५
भारतीय स्टेट बँकेचा स्थापना दिवस – १ जुलै – दरवर्षी विविध उपक्रमांनी साजरा केला जातो. यंदा बँकेच्या ७० व्या प्लॅटिनम जुबली वर्षात, भारतीय स्टेट बँक शाखा रिसोड येथे सामाजिक व ग्राहकाभिमुख उपक्रम राबवण्यात आला. यामध्ये ग्राहकांना विविध प्रकारची वृक्षसपाटी वाटप करण्यात आली तसेच बँकेचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी ग्राहकांसोबत सौहार्दपूर्ण नाते वृद्धिंगत करण्याची शपथ घेत एक आगळावेगळा संकल्प केला.



कार्यक्रमाचे आयोजन शाखा व्यवस्थापक व संपूर्ण स्टाफच्या पुढाकाराने करण्यात आले. यावेळी स्थानिक नागरिक, खातेदार, व्यापारी वर्ग व पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत वृक्ष वाटपाचा शुभारंभ करण्यात आला. यात आंबा, पिंपळ, जांभूळ, गुलमोहर, कडुनिंब, बकुळ, अशोक आदी विविध पर्यावरण पूरक वृक्षांचा समावेश होता. दरवर्षी कार्यक्रमाचे आयोजन आणि व्यवस्थापन वरिष्ठ सहाय्यक आशा बगळेकर यांच्या हस्ते राबविण्यात येतो. या उपक्रमाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे, बँकेचे सर्व कर्मचारी – श्री. सत्यनारायण प्रसाद यांच्या मार्गदर्शनाखाली – यांनी ग्राहक व बँक यांच्यातील विश्वासाचे, संवादाचे व सहकार्याचे नाते अधिक दृढ करण्यासाठी सामूहिक शपथ घेतली. "प्रत्येक ग्राहकाशी आदराने व पारदर्शक व्यवहार करणे", "बँकेच्या सेवांचा लाभ अधिक सोप्या पद्धतीने ग्राहकांपर्यंत पोहोचवणे", आणि "समाजातील सर्व घटकांसाठी बँकेला एक विश्वासार्ह संस्थान बनवणे" या उद्दिष्टांचा त्यांनी संकल्प केला. "बँकेचा स्थापना दिवस म्हणजे केवळ एक औपचारिक दिन नसून, हा दिवस समाजाशी नवी नाळ जोडण्याचा व ग्राहकांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे. वृक्षवाटप ही फक्त निसर्गपूरक कृती नसून, ग्राहकांशी वाढत्या नात्याचेही प्रतीक आहे." ग्राहकांनीही या उपक्रमाचे मनःपूर्वक स्वागत केले. अनेकांनी वृक्ष स्वीकारताना आपल्या अंगणात ते लावण्याचा संकल्प केला. तसेच, बँकेच्या सेवा-सुविधांविषयी समाधान व्यक्त करत बँकेच्या सामाजिक बांधिलकीची प्रशंसा केली. दरवर्षी प्रमाणे कार्यक्रमाचे आयोजन आणि व्यवस्थापन वरिष्ठ सहाय्यक आशा बगळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरळीत पार पडले. वृक्षांची निवड, वाटप, व शपथ विधी यामध्ये त्यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली.

## 'पिलीव नगरीला वारकऱ्यांच्या आगमनाने आले प्रति पंढरपूरचे स्वरूप"

**दैनिक युवक आधार**
**पिलीव प्रतिनिधी (रघुनाथ देवकर):-** अक्कलकोट संस्थानचे व सोलापूर सांगली सातारा जिल्ह्याच्या सरहद्दीवर असणारे ऐतिहासिक वारसा सांगणारे पिलीव हे गाव, या गावांमध्ये नेहमीच धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक वारसा जोपासला जातो. पिलीव हे गाव पंढरपूरच्या अगदी काही अंतरावर असून या पिलीव नगरीमध्ये सांगली सातारा जिल्ह्यातून एवढेच काय महाराष्ट्रातील अनेक ठिकाणाहून साधुसंत ,महाराज यांच्या दिंडी व पालखी सोहळ्यांचे आषाढी वारीच्या निमित्ताने पिलीव नगरीमध्ये आगमन झाले असून या सोहळ्याचे पिलीव नगरीमध्ये आगमन होताच असंख्य भाविक भक्तांनी मोठ्या भक्ती भावाने फटाक्याच्या आतषबाजीत व तोफांच्या सलामी तर काहींनी सडामार्जन करून "ज्ञानोबा तुकाराम"च्या जयघोषामध्ये अतिशय आनंदाने व कौतुक भरल्या नजरेने स्वागत केले.



या सोहळ्यामध्ये श्री गोरक्षनाथ महाराज ३२ शिराळा, सेवागिरी महाराज पुसेगाव, दादा महाराज सातारकर बाबा महाराज सातारकर ,संत गाडगे महाराज, संत शेकोबा दादा महाराज, श्री गोंदवलेकर महाराज, संत बाळूमामा, साईबाबा, यशवंत बाबा, विसापूर, विहापूर, इंचगिरी महाराज, कोटेश्वर महाराज, अण्णा महाराज रेवडेकर (गोवे) अशा अनेक साधुसंतांचे व महाराजांचे पालखी सोहळे व दिंडी सोहळे पिलीव मुक्कामी ग्रामपंचायत कार्यालय मारुती मंदिर, महादेव मंदिर ,श्रीराम मंदिर श्री संत सेनामहाराज मंदिर, खडीचा महादेव मंदिर ,खंडोबा मंदिर नाईक गल्ली ,कर्मवीर विद्यालय ,जवाहर विद्यालय, हरिहर मठ, साठे नगर शाळा, विविध प्राथमिक शाळा अशा अनेक ठिकाणी अनेक दिंडी व पालखी सोहळे टाळ मृदुंगाच्या गजरात खांद्यावरती भगव्या पताकी घेऊन "विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल"या नामस्मरणात कपाळी गंध, हाती टाळ -वीणा, वारकरी पोशाख घालून, अश्वासहीत अनेक प्रकारच्या पुष्पमालांनी सजवलेल्या रथासहित दाखल झाले होते. पिलीवकरांनी, सर्वांनी ज्याच्या त्याच्या पद्धतीने सेवा देण्याचा प्रयत्न केला. यावेळी पिलीव व परिसर भक्तीमय वातावरणात अक्षरशः न्हावून निघाला होता .आणि खरोखरच पिलीव नगरीला प्रति पंढरपूरचे स्वरूप प्राप्त झाल्याचे प्रत्यक्षात दिसत होते. या कालावधी त भजन ,कीर्तन प्रवचन ,भारुड, गवळणी, समाज प्रबोधनाचे कार्यक्रम सर्वांना पाहायला मिळाले. काही अंतरावरच श्रीक्षेत्र पंढरपूर आल्याने वारकरी बांधवांच्या मुखावर श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनाचा आनंद दिसून येत होता. या दिंडी सोहळ्यासाठी पिलीव येथील सर्व घटकांनी अतिशय चांगल्या प्रकारचा प्रतिसाद देऊन सेवा बजावल्याचे दिसून आले. पिलीव नगरीच्या स्वागत समारंभाने सर्व पालखी सोहळे व दिंडी सोहळे भारावून गेले होते. यांचे स्वागत समारंभ उरकून सर्व दिंडी सोहळे, पालखी सोहळे श्री क्षेत्र पंढरपूर कडे टाळ मृदुंगाच्या गजरात ज्ञानोबा तुकारामच्या जयघोषा मध्ये आनंदाने जात असल्याचे दिसून आले.

## डहाणू तालुक्यात जलजीवन मिशनच्या कामात झालेल्या

### दुर्घटनेप्रकरणी दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई - मंत्री गुलाबराव पाटील

**दैनिक युवक आधार**
**मुंबई संतोष पाटील**

पालघर जिल्ह्यातील डहाणू मधील सुकड आंबा शिरसून पाडा येथे जलजीवन मिशन अंतर्गत उभारण्यात येत असलेल्या पाण्याच्या टाकीचा स्लॅब कोसळून दोन मुलींचा दुर्दैवी मृत्यू झाला.या प्रकरणी डहाणू विधानसभा आमदार विनोद निकोळे यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचना मांडली.या घटनेप्रकरणी संबंधित उपअभियंता आणि कार्यकारी अभियंत्यांचे तत्काळ निलंबन करण्यात येणार असल्याची माहिती विधानसभेत पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिली. दुर्घटनेतील मृत विद्यार्थिनींच्या कुटुंबीयांना प्रत्येकी १.५ लाख रुपयांची मदत शासनामार्फत देण्यात आली आहे. तसेच या कामासाठी जबाबदार ठरलेल्या हरिश बोरवेल्स या कंत्राटदार कंपनीला काळ्या यादीत टाकण्यात आले असल्याचे मंत्री गुलाबराव पाटील यांनी यावेळी सांगितले

# एडब्ल्यूएल व्हर्च्युअल रिऍलिटी द्वारे भाविकांसाठी अभियान राबवणार

### डिजिटल-भौतिक दोन्ही अनुभव देणारी सात-घटकांची व्यापक रणनीती असलेली एडब्ल्यूएलची मोहीम

**दैनिक युवक आधार**
**मुंबई, वार्ताहर**

भारतातील सर्वात मोठ्या फूड एफएमसीजी कंपन्यांपैकी एक, एडब्ल्यूएल ॲग्री बिझनेस लिमिटेडने भाविकांना रथयात्रा २०२५ चा अनोखा अनुभव देण्याची तयारी केली आहे. यात पारंपरिक पाककृती आणि बहुविध तंत्रज्ञानाचे मिश्रण करून बदल केला जाणार आहे. या वर्षी डिजिटल आणि भौतिक, असे दोन्ही अनुभव देणारी सात-घटकांची व्यापक रणनीती असलेली एक मोहीम कंपनी मोठ्या प्रमाणात राबवणार आहे. संपूर्ण पुरीमध्ये इमर्सिव्ह टेक्नॉलॉजीचा वापर, स्वयंपाकाचे थेट प्रात्यक्षिक, वैयक्तिक काळजी आणि आकर्षक ॲनामॉर्फिक आउटडोअर आणि ट्रान्झिट ब्रँडिंगद्वारे म्हणजेच सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेच्या माध्यमातून जाहिरात करत लाखो भाविकांना गुंतवून ठेवणे हे या



उपक्रमाचे उद्दिष्ट आहे. श्री.मुकेश मिश्रा, संयुक्त अध्यक्ष, विक्री आणि विपणन, एडब्ल्यूएल ॲग्री बिझनेस लिमिटेड म्हणाले,"आम्ही नेहमीच स्थानिक गोष्टींना प्राधान्य देतो, जे आम्हाला आमच्या प्रेक्षकांशी अधिक चांगल्या प्रकारे जोडण्यास मदत करतात. आमचा हा स्थानिक दृष्टिकोन प्रादेशिक, सांस्कृतिक आणि पसंतीच्या पाककृतींच्या सखोल आकलनावर आधारित आहे, ज्यामुळे आम्ही ब्रँडच्या माध्यमातून अधिक प्रामाणिक आणि अर्थपूर्ण मार्गांनी ग्राहकांशी जोडले जाऊ शकतो. जगन्नाथ रथयात्रेसारख्या अध्यात्मिकदृष्ट्या महत्त्वाच्या कार्यक्रमांमध्ये हे तत्वज्ञान आमच्या उपस्थितीचे दर्शक आहे. रथयात्रा 2025 मधील आमचे ध्येय परंपरेचे नावीन्यपूर्ण मिश्रण करून या अनोख्या सांस्कृतिक कार्यक्रमाचा सन्मान करणे हे आहे. म्हणूनच आम्ही एका व्हीआर अनुभवाचा भक्तांसाठी संपूर्ण बहु-संवेदी प्रवासापर्यंत विस्तार केला आहे, तसेच प्रसादाची व्हर्च्युअल स्वयंपाक सत्रे, मंदिरांचे डिझाइन असलेला रेसिपी झोन आणि लाइव्ह किचन यासारख्या अनुभवांसह, आम्ही भक्तांना फॉर्च्यून आणि अलाइफ सारख्या आमच्या ब्रँडशी संवाद साधण्याची संधी देतो. आणि पारंपरिक पद्धतीने उत्सव साजरा करत भक्तांचा विश्वास मनापासून साजरा करतो."

या वर्षी उत्सवाच्या केंद्रस्थानी 40 फूट उंच पोस्टरद्वारे कंपनीचा प्रमुख ब्रँड फॉर्च्युन आपली उपस्थिती दर्शवेल. फॉर्च्युन झोनमध्ये तीन वेगळे अनुभव येतील एक मिक्स्ड रिऍलिटी (MR) आणि व्हर्च्युअल रिऍलिटी (VR) झोन, नमुन्यांसह स्वयंपाकाचे लाइव्ह प्रात्यक्षिक आणि ब्रँड कंटेंटसह ग्राहकांना गुंतवून ठेवण्यासाठी एक मोठी LED स्क्रीन. या झोनमधील एक विशेष आकर्षण म्हणजे यात सहभागी होणाऱ्यांना व्हीआर हेडसेट-ऑक्युलस घालून प्रत्यक्ष फॉर्च्यून उत्पादनांचा वापर करून खिचडीसारखे पारंपरिक महाप्रसाद करण्याची संधी मिळेल. त्यानंतर हे भक्त जगन्नाथ मंदिरात प्रसाद अर्पण करण्यासाठी व्हर्च्युअल रिऍलिटी वातावरणात जातील. याव्यतिरिक्त, स्वतःची काळजी घेण्यासाठी मदत करणारा कंपनीचा ब्रँड 'अलाइफ' हा उपयुक्ततेवर आधारित उत्तम अनुभव देईल. स्नानानंतर भाविकांना ताजेतवाने होण्यासाठी समुद्रकिनाऱ्याजवळ एक चेंजिंग स्टेशन उभारले जाईल. यासोबतच फॉर्च्युन-ब्रँडेड ई-रिक्षांचा ताफा पर्यटकांना शहरातून फिरवून आणेल, ज्यामुळे आराम तर मिळेलच पण पर्यटकांची सोयही होईल. पुरी समुद्रकिनाऱ्यावर एक मोठी एलईडी स्क्रीन लावली जाणार असून त्यात आकर्षक अनॅमॉर्फिक कंटेंट दाखवला जाईल, ज्यामुळे एकूणच उत्सवाच्या वातावरणाला चार चांद लागतील.

## गुरुमाऊली चंद्रभागा फाउंडेशन(रजि.)तर्फे निळकंठ बगळे 'सामाजिक कर्तव्यदक्ष पुरस्कार-२०२५ ने सन्मानित

**दैनिक युवक आधार**
**मुंबई (शांताराम गुडेकर)**



गुरुमाऊली चंद्रभागा फाउंडेशन(रजि.)तर्फे तालुका लांजा जिल्हा रत्नागिरी लांजा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सन्मा. श्री.निळकंठ बगळे साहेब यांना "सामाजिक कर्तव्यदक्ष पुरस्कार-२०२५ देऊन नुकतेच सन्मानित करण्यात आले.लांजा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सन्मा.श्री. निळकंठ बगळे साहेब लांजा तालुक्यामध्ये आल्यापासून खूप काही चांगले निर्णय घेऊन चांगले काम करत आहेत.लांजा तालुक्यामध्ये बाहेरून येणारे परप्रांतीय यांची सखोल चौकशी करून त्यांची विचारपूस करत आहेत. आपले कर्तव्य लक्षात घेऊन खूप काही मोलाची चांगली कामे केली. तसेच लांजा तालुकामध्ये कोणत्याही संस्थेचे व समाजाचे कार्यक्रम असले की त्यांना आमंत्रण दिल्यानंतर ते त्या आमंत्रणाचा आदर करून हजर राहतात. त्याचा लांजा मधील नागरिकांना खूप अभिमान आहे.पोलीस निरीक्षक साहेबाना सोमवार( दि.३० जून २०२५)रोजी गुरुमाऊली चंद्रभागा फाउंडेशनच्यावतीने लांजा पोलीस स्टेशनला भेट देऊन त्यांना सामाजिक कर्तव्यदक्ष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. गुरुमाऊली चंद्रभागा फाउंडेशन संस्थेचे अध्यक्ष डॉ.चंद्रकांत करंबळे,उपाध्यक्ष श्री.सुभाष रामाणे,महासचिव- अमोल मेस्त्री,खजिनदार श्री. रवींद्र कोटकर यांच्य उपस्थित लांजा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री.निळकंठ बगळे साहेब यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी रत्नागिरी शहरी विभागाचे पोलीस अधिकारी व हवालदार तसेच लांजा तालुक्याचे पोलीस अधिकारी व हवालदार. कर्मचारी वर्ग उपस्थित होते. उच्च न्यायालयाचे कर्मचारी,समाजसेवक श्री. चंद्रकांत चंद्रभागा शिवराम करंबळे हे गुरुमाऊली चंद्रभागा फाउंडेशनच्या प्रयत्नाने रत्नागिरी जिल्हा दिव्यांग समन्वय समितीला आर्थिक मदत,याशिवाय जेष्ठ नागरिक समूहाला पाणी, बिस्कीट वाटप केले जाते.गुरुमाऊली चंद्रभागा फाउंडेशनचे अध्यक्ष समाजसेवक श्री. चंद्रकांत शिवराम करंबळे आणि परिवार व पदाधिकारी, सदस्य, सभासद, हितचिंतक यांच्यातर्फे कोकणात दरवर्षी विविध उपक्रम राबविण्यात येतात.शिक्षण,समाजसेवा, ग्रामसेवा, तंटामुक्त, कृषीसेवा, शेती विकास, कामगार, उद्योग, साहित्य, कला, क्रीडा, ग्रंथपालन, पर्यावरण आदी क्षेत्रात गुरुमाऊली चंद्रभागा फाउंडेशनचे कार्य कौतुकास्पद आहे.फळाची अपेक्षा न ठेवता सतत कार्य करत रहाणे हे गुरुमाऊली चंद्रभागा फाउंडेशनचे अध्यक्ष समाजसेवक श्री.चंद्रकांत शिवराम करंबळे यांचा मूळ उद्देश आहे.गुरुमाऊली चंद्रभागा फॉउंडेशनचे सर्व पदाधिकारी, सदस्य आणि सभासद, हितचिंतक यांचा या सर्व कार्यास मोलाचा सहभाग असतो.

## पनवेल महानगरपालिकेचा अभिनव उपक्रम

### महापालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाकडून पांजरपोळमध्ये जंत निर्मूलन शिबीर

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**



आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशानुसार पनवेल महानगरपालिकेच्या पशुवैद्यकीय विभागामार्फत पनवेल येथील 100 वर्ष जुन्या पांजरपोळ येथे जंत निर्मूलन व आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात एकूण ७९ गायवर्गीय प्राण्यांचे जंत निर्मूलन करण्यात आले. या शिबिरात गायींच्या जंत निर्मूलनासोबतच आरोग्य तपासणी, उपचार, तसेच ३० गायींची गर्भतपासणी व वंध्यत्व तपासणी देखील करण्यात आली. यावेळी गाभण, वंध्यत्वाने त्रस्त आणि दुर्बल गायींकरिता क्षार मिश्रण व कॅल्शियम टॉनिकचे मोफत वाटप करण्यात आले. उपायुक्त डॉ. वैभव विधाते व मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी या सूचनेप्रमाणे घेण्यात आलेल्या या शिबिरासाठी पशुवैद्यकीय विभागातील तज्ज्ञ अधिकारी डॉ. भगवान गिते, डॉ. मधुलिका लाड, पांजरपोळचे उपाध्यक्ष नितीन मुनोत, डॉ. लाजरी पावसकर, डॉ. राधिका आव्हाड, तसेच पशुसंवर्धन विभागाचे डॉ. समीर तोडणकर, डॉ. मुकेश मर्चंडे, डॉ. आनंद मारकवार आणि इतर कर्मचारी उपस्थित होते.

पनवेल महानगरपालिकेच्या या अभिनव उपक्रमामधून पशुधनाच्या आरोग्य संवर्धनास चालना मिळून स्थानिक पशुपालकांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे.